वा०व ८१२

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा०वा-
दा. क्र. ८१२

BVBK 0-00812
BVBK-0400812

कि

बा.वा.
नों.क्र. १९२

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १९२ दिनांक ......
विषय किशोर क्र. ३०१

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दिनांक .....
क्रमांक ....303

# चरणकमल

लेखक :

**फादर वालेस**

BVBK-0400812

अनुवादक :

**भाऊ धर्माधिकारी**



श्री : ७५९ ( ८.७६.२१ )

* * *

© १९७६

फादर वालेस

* * *

आवृत्ती पहिली :

शके १८९८, सन १९७६

* * *

मूल्य चार रुपये

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
यांचेकरिता
३, राउण्ड बिल्डिग
मुंबई ४०० ००२.

* * *

मुद्रक :

ले. कर्नल वि. वा. जोशी
सकाळ छापखाना

# धन्य ते चरणकमल !

भक्ताला शिष्यांनी विनंती केली : "आम्हाला प्रार्थना करायला शिकवा."

भक्त हसला. काहीशा प्रसन्नतेनं आणि काहीशा लाचारीच्या भावनेनं तो हसला. तो नुकताच प्रार्थनेला बसला होता, खोल ध्यानात उतरला होता. त्याच्या मुखावर धन्यतेचा भाव होता. त्याच्या अंगप्रत्यंगातच मौनाची स्फूर्ती आणि साधनेचं तेज चमकत होतं. त्याचा तो दिव्य आनंद पाहून शिष्य शुभ भावनेनं लोभावले आणि त्यांनी विनंती केली : "आम्हाला सुद्धा प्रार्थना करायला शिकवा ना."

आणि भक्त पुन्हा हसला.

अहो, हृदयाचे भाव काय शिकता येतात ? अंतरीची कासावीशी काय शिकून येते ? जीवनाचा श्वास काय शिकता येतो ? त्याचे काय वर्ग चालवावेत, प्रमाणपत्रे द्यावीत ? शास्त्रं शिकून शिकता येतात, भजनं ऐकून पाठ करता येतात, पण प्रार्थना ही अंतरीची गोष्ट आहे, आत्म्याची गोष्ट आहे. ती शब्दांत नाही येणार, धडे देऊन नाही शिकविता येणार

म्हणून भक्त हसला. त्याला माहीत होतं की प्रार्थनेचं मूळ भक्ती आहे. भक्ती जागी झाली की कासाविशी वाटू लागेल, ध्यान लागेल आणि साधना फळाला येईल. सर्व काही सरळ होईल, जवळजवळ आपोआप सरळ होईल. आणि भक्ती जर नसेल तर अभ्यास असला, विद्वत्ता असली, तप असलं, दान असलं तरी प्रार्थना फुलणार नाही. प्रार्थनेसाठी भक्ती हवी. ध्यानासाठी शरणागती हवी.

मग भक्तानं एक फूल घेतलं. पूजेसाठी शिष्यांनी फुलं आणली होती त्यांतलं एक फूल त्यानं उचललं अन् समोर भगवंताची मूर्ती होती तिच्या चरणांवर त्यानं ते भावपूर्वक लावून ठेवलं. तो काही बोलला नाही. त्याचा तो फक्त अभिनय होता, संकेत होता. भगवंताच्या चरणकमलाकडे तो प्रेमानं, ध्यान लावून, लीन होऊन पाहात राहिला. त्या चरणांवर ते फूल होतं, म्हणजे त्याचं स्वतःचं हृदय होतं. त्यात तो रंग नि तो सुवास नि ते समर्पण नि ती भक्ती होती. त्यात मूर्तिमंत प्रार्थना होती. तो बोध होता. प्रार्थना भगवंताच्या चरणांपाशी शिकायची. ते तिचं विद्यापीठ आहे, तिचं धाम आहे. खरा पाठ तिथं मिळेल आणि खरं शिक्षण तिथं दिलं जाईल. खरी प्रार्थना तिथं असेल. भगवंताच्या चरणी समर्पण होऊनच भक्ताचं हृदयकमल फुलेल.

धन्य ते चरणकमल !

चरणकमल


१. तीव्र तळमळ

२. धन्याचं आमंत्रण

३. दर्शन

४. आरती

५. प्रसाद

६. स्वस्तिक

७. कथा

८. जप

९. प्रार्थनेचा सोबती

१०. मौन

११. देवापुढं आग्रह धरू या

१२. वेळ नाही

१३. नित्य नवीनता

□ लेखकाचा परिचय

# १ : तीव्र तळमळ

एक सुंदर पुस्तक हाती आलं होतं. चांगली पुस्तकं वाचल्यानं मन आणि हृदय कसं जागृत होतं त्याचा अनुभव अनेक वेळा आला होता. जेव्हा हे पुस्तक हाती आलं–ते चांगलं काय, उत्तमच आहे याची खात्री एका ज्ञानी मित्राकडून मिळाली होती – तेव्हा त्याचा मनाला अतिशय आनंद झाला आणि ते पुस्तक सांभाळून, रोज एक एक प्रकरण वाचून, त्याचं मनन करून पुष्कळ दिवस मनाला धर्माचं पोषण देत राहावं असा निर्णयही केला.

पुस्तक होतं स्वामी रामदासांचं – 'भगवंताच्या शोधात'; आणि त्यात अनुभवाचा बोध आणि प्रत्यक्ष साधनेचं दर्शन मिळेल अशी मनाची ग्वाही होती. म्हणून कृतार्थ भावानं ते पुस्तक हाती घेतलं, त्याला मनोमन वंदन केलं आणि भक्तीच्या ऊर्मीनं त्याच्या पारायणाचं मंगलाचरण केलं.

पहिलं पान उघडलं, पहिलं प्रकरण बघितलं, त्यातलं पहिलं वाक्य वाचलं . . आणि हृदय आनंदानं नाचू लागलं. त्या पहिल्या वाक्यातच पुरेशी शिधोरी मिळण्याजोगी वाटली, दिवसानुदिवस पुरेल, नव्हे जन्मभर पुरेल अशी प्रेरणा त्यात होती. खरंच, पुस्तक छान होतं, जीवनात पालट घडवून आणील असं होतं, हृदयात खोलवर उतरेल असं होतं, आणि त्याची साक्ष देणारं, त्याची प्रतीती करून देणारं ते पहिलं वाक्यच होतं. ते वाक्य होतं : "दोन वर्षांपूर्वी भगवंतानं रामदासाच्या अंतःकरणात भगवंताला प्राप्त करण्याची तीव्र तळमळ जागृत केली." संपलं. आता पुढं वाचण्याची जरूर नव्हती. सगळ्या पुस्तकात पुढं काय काय येणार त्याचा संकेत मिळाला होता. प्रभूच्या प्राप्तीची तीव्र तळमळ. तिच्या मागोमाग सर्व काही येईल. त्याग येईल, तप येईल, साधना येईल, पुण्य येईल आणि शेवटी प्रभू येईल. तळमळ त्यानं जागी केली आहे तेव्हा तो ती शमवील. आणि तळमळ आहे, खरी तळमळ, तीव्र तळमळ आहे तर प्रभूला ओढून आणल्याशिवाय ती राहाणार नाही. यात साऱ्या जीवनाचं रहस्य आहे, आणि यात मोठ्या साधनेचं बळ आहे. स्वामी रामदासांच्या जीवनात असंच घडलं. ही तळमळ अंतःकरणात जागृत झाली त्याबरोबर ते निघाले, सगळं सोडून देऊन निघाले, रामनामाचा जप घेऊन

निघाले आणि सगळीकडं आपल्या पवित्र आनंदानं, पुण्यानं, सिद्धीनं धर्माचं मंगल वातावरण पसरवीत राहिले. त्यांचं जीवन खरोखरीच कल्याणकारी होतं, सिद्धपुरुषाचं होतं आणि त्याचं रहस्य त्या लहानशा सूत्रात, या पहिल्या वाक्यात होतं : "प्रभूनं तळमळ जागृत केली." त्या तळमळीचा इतिहास त्या पुस्तकात होता. तिचा शुभ प्रभाव साधकाच्या सगळ्या जीवनावर होता.

※

तळमळ, खरी तळमळ, तीव्र तळमळ. ती असेल तर सर्व काही मिळेल, ती असेल तर सगळी दारं उघडतील, ती असेल तर सगळे रस्ते सुगम होतील.

साधनेचा पाया, अध्यात्माचं मूळ, नीतिधर्माचं सार ही तळमळ. प्रभू भेटावा अशी तळमळ, त्याचं दर्शन व्हावं ही तळमळ, त्याच्याशी एकरूप व्हावं ही तळमळ. ती असेल तर कठिण कठिण तपं सोपी वाटतील आणि मोठमोठ्या कसोट्या हलक्या वाटतील. प्रभूविषयीची खरी, तीव्र, सतत तळमळ असेल तर प्रभू मिळेल आणि सारं जीवन धन्य होईल.

श्रीरामकृष्ण परमहंसांचा हा रोजचा उपदेश असायचा. त्यांच्याकडे जिज्ञासू, भक्त, साधक येत आणि विचारीत : प्रभूला मिळविण्याकरिता काय करावं ? साक्षात्कार होण्याकरिता काय करावं ? मुक्ती प्राप्त करण्याकरिता काय करावं ? तेव्हा ते मुख्य उत्तर असं देत मनापासून इच्छा करा, आतुरता दाखवा, तळमळ ठेवा – प्रियतमेच्या प्राप्तीसाठी ठेवता तितकी; कीर्तीसाठी किंवा धनाच्या प्राप्तीसाठी ठेवता तितकी; 'कामिनी-कांचना'करिता ठेवता तितकी; पागलासारखी, प्रेमी माणसासारखी. लहानसान आपत्तीनं, घरच्या दुःखानं, प्रियजनांच्या वियोगानं रडता, आसवं ढाळता, तर भगवंताच्या नावानं आजवर तुमचा एक तरी अश्रुबिंदू पडला आहे का ? ज्या दिवशी तो पडेल त्या दिवसापासून तुमची साधना सुरू होईल. एका खोलीत चोर बसला आहे. रात्रीची वेळ आहे अन् तो एकटा आहे. बाजूच्या खोलीत सोन्याचा ढीग पडलेला आहे तो त्याला माहीत आहे. मध्ये एक पातळ भिंत आहे. तर त्या चोराला झोप येईल का ? तो खुशाल पाय ताणून झोपी जाईल ? छे , त्याचं मन त्या सोन्याच्या ढिगाकडे लागलेलं आहे, म्हणून तो त्याचाच विचार करील, ते कसं चोरायचं याची मनात योजना बनवील, भिंतीत भोक कुठं

पाडायचं याचा तपास करील अन् कुणालाही समजणार नाही अशा रीतीनं निसटून कसं जाता येईल याचा रस्ता शोधून ठेवील. चोराचं मन सोन्यात आहे, आणि सोनं जवळच आहे, तर चोर झोपेल कसा ? असंच. प्रभू जवळ आहे, मधे मायेची पातळ भिंत आहे, तर भक्ताला झोप येईल कशी ? आणि आली तर तो खरा भक्त नव्हे. आणि खरा भक्त नसेल तर भगवान भेटणार नाही. शरमेची गोष्ट ही आहे की, चोराला चार गलिच्छ पैशासाठी जी कासाविशी आहे ती आपल्याला जो धर्माचा निधी, हृदयाचा स्वामी त्याच्याकरिता नाही. मग तो न मिळेल यात काय आश्चर्य ?

※

शिष्य गुरूला विचारतो : " प्रभूला मिळविण्यासाठी काय करावं ?" गुरू काही बोलत नाही, स्नानाकरिता नदीला जायला निघतो आणि शिष्याला बरोबर चल म्हणून सांगतो. दोघेजण नदीच्या पाण्यात बरेच आत जातात. तेवढ्यात गुरू अचानक शिष्याचं डोकं पकडतो आणि पाण्यात बुडवतो आणि जबरदस्तीनं बुडवूनच ठेवतो. शिष्य घाबरतो, गुदमरतो. श्वास घुटमळू लागताच बाहेर येण्याची तडफड करतो, पण गुरूच्या हाताची पकड मजबूत आहे, तिनं त्याचं डोकं पाण्याच्या आतच राहातं. शेवटी तो बेशुद्ध व्हायला लागतो तेव्हा गुरू पकड सोडतो, शिष्य उसळी घेऊन बाहेर येतो, जोरानं श्वास घेतो, रागानं गुरूकडे पाहातो. गुरू काही बोलत नाही अन् दोघेजण परत आश्रमाकडे येतात. संध्याकाळी गुरूकडे बोधाकरिता शिष्य येतो, तेव्हा गुरू विचारतो, " आता समजलं?" "काय समजलं ? माझं डोकं आणखी एक क्षण पाण्यात राहिलं असतं तर मी राम म्हटलं असतं. एवढं मात्र समजलं खरं !" गुरू म्हणाला," झालं तर मग. तू पाण्यात होतास तेव्हा हवेसाठी, श्वास घेण्यासाठी जी तुझी उत्कंठा होती तेवढी उत्कंठा भगवंताला प्राप्त करण्यासाठी येईल तेव्हा तुला तो मिळेल."

हाच बोध होता. हवेकरिता, श्वासाकरिता, प्राणाकरिता जेवढी आतुरता तेवढी देवाकरिता. तो सुद्धा आपला प्राणच आहे ना! आणि तेवढी कासाविशी असेल तर तो अवश्य येईल आणि आमचं हृदय आपल्या दिव्य प्रसादानं भरून टाकील. दु:ख एवढंच आहे की प्रभू खरोखर आपला प्राणच आहे ही गोष्ट आपण मनापासून मान्य करीत नाही, व्यवहारात मानीत नाही. देहाकरिता

हवेची जरूर आहे त्याहूनही आत्म्याला भगवंताची अनेक पटींनी जरूर आहे. या सत्यात जागृतीचं बीज आहे, आणि हे विसरणं हे आपल्या दुर्दैवाचं, आळसाचं आणि जडतेचं पहिलं कारण आहे. साधनेच्या मार्गात पुष्कळ लोक मागं का पडतात आणि अयशस्वी होतात त्याचं मूळ कारण हेच की, सत्यसंकल्पाचा अभाव असतो. सत्यसंकल्प भगवान कधी व्यर्थ जाऊ देत नाही. अन् त्यात सुद्धा त्यालाच प्राप्त करण्याचा हृदयाचा सत्यसंकल्प असेल तर तो सफल केल्यावाचून तो राहात नाही. पण आपला संकल्प सत्यसंकल्प कधी नसतो, तो पोचट असतो, ढिला असतो, अनेक हलके भाव नि तर्क नि स्वार्थ यांनी मिश्रित झालेला असतो. ईश्वर हवा, पण अमुक प्रकारे हवा, अमुक शर्तीवर हवा, आपल्याला सुख-शांती मिळावी म्हणून हवा, आपली सिद्धी लोकांनी पाहावी म्हणून हवा. संकल्प आहे पण मिश्रित आहे, पांगळा आहे, दुबळा आहे, म्हणून तो सफल होत नाही. भगवंताची प्रतिज्ञा आहे की तो मानवहृदयाचा शुद्ध सत्यसंकल्प कधी व्यर्थ जाऊ देणार नाही. म्हणून 'उभारोनी बाहे । विठो पालवीत आहे.' तो खरा पवित्रसंकल्प हृदयात जागवू या, वाणवू या, दृढ आणि अमर बनवू या.

※

चार शतकांपूर्वी एक पवित्र पुरुष होऊन गेले, त्यांनी साधूंच्या एका संघाची स्थापना केली होती. तो आजही चालू आहे.संघात योग्यच माणसे दाखल व्हावीत म्हणून त्यांनी उमेदवारांकरिता अनेक अटी आणि कठिण कसोटचा आज्ञापिल्या. अमुक अभ्यास, अमुक पात्रता, शिक्षण, साधना असेल तरच त्या माणसाला संघात घ्यायचा असा त्यांचा आग्रह होता, आणि आजतागायत तो आग्रह आणि ते नियम त्यांच्या संघात पाळण्यात येतात. त्या विविध चौकश्यांच्या आणि कसोटयांच्या अंती उमेदवाराला एक विशेष प्रश्न विचारावयाचा असे—तो आजही विचारला जातो आणि त्या प्रश्नाचे उत्तर उमेदवार जे देईल त्यावर त्याला संघात घ्यायचं की न घ्यायचं याचा शेवटचा निर्णय घ्यावा असे त्यांनी ठरविलं होतं. तो प्रश्न असा होता: "तुम्हाला संघात दाखल होण्याची इच्छा आहे, नवे जीवन स्वीकारण्याची तुमची इच्छा आहे, तर त्या नव्या जीवनाकरिता, त्या साधनेच्या आणि तपाच्याद्वारा मिळणाऱ्या ईश्वराच्या साक्षात्काराकरिता आणि आत्म्याच्या मुक्तीकरिता तुम्हाला तीव्र इच्छा आहे काय ?" या प्रश्नाचं उमेद-

वाराकडून 'होय' असं उत्तर आलं तर त्याला घेता येईल. जर तो 'नाही' म्हणेल, तर तो निखालसपणे असं कबूल करील की त्या साधनेच्या बाबतीत मनाची काहीशी प्रवृत्ती आहे खरी,आणि म्हणून तर मी हा आलो आहे, पण तितकी तीव्र म्हणता. तशी इच्छा नाही. मग त्याला पुन: दुसरा प्रश्न विचारायचा की, " ती इच्छा तुम्हाला नाही, पण ती इच्छा तुम्हाला व्हावी याविषयी तुम्हाला तीव्र इच्छा आहे की नाही ?" म्हणजे इच्छा नसेल तर इच्छेची तरी इच्छा आहे का, आज नाही पण उद्या व्हावी अशी आजपासून तळमळ. या दुसऱ्या प्रश्नाला जर उमेदवार मनापासून 'हो' म्हणेल तर त्याला घेता येईल; पण जर या दुसऱ्या प्रश्नाला देखील तो 'नाही' म्हणेल, जर तो म्हणेल की तीव्र इच्छा नाही आणि ती इच्छा व्हावी अशी इच्छेचीही इच्छा नाही तर त्याचे इतर सगळे गुण नि अभ्यास, पात्रता नि तयारी वाटेल तितकी असली तरी त्याला संघात घेता येणार नाही. असा नियम होता, आजही आहे आणि त्याच्या मुळाशी सत्य-संकल्प असण्याचा महत्त्वाचा स्वीकार आहे. तो संकल्प असेल तर सर्व होईल; तो नसेल तर इतर सर्व वाटेल ते आणि वाटेल तितकं असलं तरी – काही होणार नाही.

संकल्प–इच्छा–तळमळ.

" भगवंतानं रामदासाच्या हृदयात भगवंताला प्राप्त करण्याची तीव्र इच्छा जागृत केली." संपलं. यात संताचं जीवनचरित्र आलं. त्यात साधनेचं सार आलं. यात धर्माचं बळ आलं. ती तळमळ घेऊन आता आपण साधना सुरू करू या. प्रार्थनेला बसू या.

# २ : धन्याचं आमंत्रण

प्रार्थनेला बसलो आहो.

प्रार्थनेला आपण का आलो ? प्रार्थनेची वेळ झाली म्हणून ? की दुसरे यायला निघाले म्हणून ? की मनाशी ठरविलं होतं, निर्णय घेतला होता की, आज प्रार्थना करायची आहे म्हणून ?

नाही, आपण प्रार्थनेला आलो आहोत कारण भगवंतानं आपल्याला बोलावलं आहे, त्याचं आमंत्रण आहे, त्याची आज्ञा आहे. भगवंताच्या आज्ञेवाचून कोणी त्याच्यापुढं जाऊ शकत नाही, आणि प्रार्थना म्हणजे भगवंतापुढं जाणं, म्हणून त्याच्या आज्ञेवाचून कोणी प्रार्थनेला बसेल ही शक्यता नाही. राजाची आज्ञा नसताना राजाच्या पुढं जाऊ नये. धन्याचा आदेश नसेल तर त्याला भेटायला जाऊ नये. भगवंताच्या आमंत्रणावाचून प्रार्थनेला बसू नये.

हा पहिला भाव आहे. प्रार्थनेला आलो आहोत ते बोलावलं म्हणून आलो आहो, आज्ञा शिरसावंद्य करून आलो आहो. संदेश मिळाला म्हणून आलो आहो. इच्छा होती, प्रतीक्षा होती, निर्णय होता, तळमळ होती. पण ती निव्वळ आपली तयारी होती. अजून वरून आवाहन यायचं होतं. राधिका शृंगार करते, ध्यान धरते, कान लावते पण मुरलीचे सूर कानी आले नाहीत तोवर त्या कन्हैयाकडे तिला धाव घेता येणार नाही. आत्म्याचा शृंगार आवश्यक आहे, पण मुरलीचं आमंत्रण आलं नाही तोपर्यंत मिळणी होऊ शकणार नाही.

प्रार्थना म्हणजे मिळणी आणि म्हणून ती केवळ आपल्या प्रयत्नांनी अस्तित्वात येऊ शकणार नाही. प्रार्थना ही आपल्या आवाक्यातली गोष्ट नाही, आपल्या बुद्धीचं कसब नाही, निव्वळ आत्मबळाचा परिणाम नाही. तो कृपेचा विषय आहे, अनुग्रहाचं वरदान आहे. म्हणून प्रार्थनेला आम्ही येतो ते कृतज्ञ भावानं येतो, महान कृपा लाभली आहे याची जाणीव ठेवून येतो. या भावनेत सफळ प्रार्थनेचं बीज आहे.

कितीएक वेळा आपली प्रार्थना वाया जाते, शुष्क ठरते, रसरहित, कसरहित बनते, त्याचं कारण हेच असतं, आपण स्वेच्छेनं प्रार्थनेला येत होतो, आज्ञा न घेता, संदेश न पकडता, आमंत्रणाची वाट न पाहाता येत होतो. प्रार्थनेची वेळ होती, नियम होता, व्रत होतं, सवय होती म्हणून

येत होतो. आणि 'आता मी प्रार्थनेला बसेन, ध्यान धरीन, जप करीन, पाठ करीन, सेवा करीन, मी करीन, मी दाखवीन' या भावनेनं येत होतो. म्हणजेच आपण एकले येत होतो आणि एकले परत जात होतो. मिळणी झाली नव्हती. प्रार्थना झाली नव्हती. देवघरात तासन् तास बसलो होतो तरी सुद्धा. ती फक्त कसरत होती. मनाची किंवा ओठाची किंवा बोटांची किंवा कंठाची, त्यात भक्तीचे शब्द येत होते, प्रार्थनेचे उद्‌गार येत होते, पण ती प्रार्थना नव्हती, भक्ती नव्हती. ती होती फक्त शब्दांची रचना आणि सुरांची आवली. येण्याचा अधिकार नव्हता, म्हणून रिकामा हेलपाटा पडला.

※

खऱ्या प्रार्थनेला पूज्यभाव घेऊन यावं, मिलनाची पूर्वसूचना घेऊन यावं, धन्यतेच्या अनुभूतीसह यावं. राजाचा हुकूम मिळाला आहे, प्रियतमाचा संदेश मिळाला आहे या आनंदानं अन् श्रद्धेनं यावं. आणि त्या श्रद्धेनं येऊं तर प्रियतम अवश्य भेटतो, भगवान भेटतो आणि प्रार्थना पल्लवित होते.

बायबलात एक वचन आहे : "तुम्ही मला बोलावलं नाही, मी तुम्हाला बोलावलं आहे. तुम्ही मला निवडलं नाही, मी तुम्हाला निवडलं आहे." भगवंताबरोबरच्या आपल्या व्यवहाराचा हा मोठा सिद्धांत आहे. निवड त्याची, आमंत्रण त्याचं, पहिलं पाऊल त्याचं. आपला धर्म केवळ ऐकण्याचा, येण्याचा, अनुसरण्याचाच आहे. आपलं सारं जीवन भगवंताच्यापुढे प्रतिसादरूपानं आहे. तो बोलावील तेव्हा आपण हजर; तो येईल तेव्हा आपण सामोरे तयार. नोकराचा धर्म. सखीची भूमिका. या भावानं त्याच्यापुढं जाऊ तेव्हा तो प्रसन्न होईल, कृपेचा वर्षाव करील, भक्ताच्या हृदयाला आपल्या सान्निध्याचा साक्षात्कार करवील.

हा भाव धरून आपण आता प्रार्थनेला बसलो आहो. "प्रभू, हा मी आलो आहे, तुझा सेवक हजर आहे. काय आज्ञा आहे?" म्हणजे हृदयात आशा आहे, ग्वाही आहे, धन्य प्रतीक्षेचा अनुभव आहे. भगवंतानं बोलावलं आहे तेव्हा कशा-साठी तरी बोलावलं असेल, असं अनुमान आहे. आणि म्हणून अंतःकरणात त्या आनंदाचं स्पंदन आहे. जर आपण होऊन प्रार्थनेला आलो असतो तर आल्यावर चिंता पडली असती की आता काय करायचं? योजना आपली होती,

प्रयत्न आपला होता, आपल्या चतुराईचा प्रयोग होता. म्हणून आता काय करायचं काय बोलायचं नि काय चालवायचं याची चिंता वाटली असती. जर प्रार्थना ही आपण केलेली प्रवृत्ती असती तर तिला आल्यावर ती यशस्वी करण्याकरिता आपली धावाधाव सुरू झाली असती आणि अर्थात या धावाधावीत प्रार्थनेची सगळी भावना मारली गेली असती. पण आता आपण आलो आहोत ते आमंत्रण स्वीकारून आलो आहोत, भगवंताच्या बोलावण्यावरून आलो आहोत. म्हणून आता चिंता नाही. योजना त्याची, प्रवृत्ती त्याची, कार्यक्रम त्याचा. त्यानं बोलावलंय तर काहीतरी कारणासाठी बोलावलं असेल. काय बरं कारण असेल, काय बरं मिळणार आहे, या आनंदानिशी आपण धावत येतो. त्या श्रद्धेनं प्रार्थनेला बसतो.

प्रार्थनेची पहिली वृत्ती ही. मौन. शांती. ध्यान. प्रतीक्षा. वाट पाहणं. पूर्वसूचना.

राजसभेच्या प्रतीक्षालयात वसलो आहो. प्रियतमाच्या घराच्या अंगणात वसलो आहो. ही काय कमी धन्यता आहे, कमी सद्भाग्य आहे ?

※

प्रार्थनेची तयारी करता कामा नये असं नाही. प्रार्थनेची तयारी पाहिजे, पूर्वविचार पाहिजे. आज प्रार्थनेला काय बोलायचं, काय गायचं, शास्त्राचा कोणता पाठ वाचायचा, कोणतं सूत्र घेऊन चिंतन करायचं याचा अगोदर विचार केला पाहिजे. ही सामग्री घेऊन प्रार्थनेला आपण येतो, या नैवेद्याचं श्रीफळ घेऊन यज्ञाला बसतो. पण ते फक्त भगवंताच्या चरणी अर्पण करण्याकरिता आहे. खरं फळ तो देणार, खरी प्रार्थना तो चालविणार. आपण तयारी करायची. त्यात विवेक आणि शिष्टाचार आहे (कारण की, रिकाम्या हाती भगवंतापुढं जायचं नसतं.) पण प्रार्थना सुरू होताच ही सर्व तयारी बाजूला ठेवायची. यात श्रद्धा आणि शरणागती आहे. स्वत तयार केलेलेच भोजन जेवण्याचा आग्रह जर आपण ठेवला तर प्रभू त्याचा प्रसाद आपल्याला चाखायला देणार नाही, आपण घोकलेलीच प्रार्थना म्हणण्याचा हट्ट धरून बसलो तर प्रभू आपली वाणी ऐकविणार नाही. हां, कदाचित एखाद दिवशी आपल्याला प्रार्थनेला बोलावल्यानंतर प्रभूनं काही वेळ विलंब केला, कसोटी पाहिली, एकट्यानंच

बसायला लावलं तर ही तयारी उपयोगी पडेल; तो पाठ अन् तो जप न् ते भजन न् ते मनन, उपयोगात आणता येईल आणि ती प्रार्थना कशीबशी श्रमपूर्वक चालवता येईल. राजमहालाच्या स्वयंपाकघरातून भोजन नाही मिळालं तर सोबत बांधून आणलेल्या भाकरीचे दोन घास खाऊन भूक थोपवून धरू; पण तो झाला अपवाद, कसोटीच्या दिवसांकरिताच ती तयारी आहे. एका साधकाचा विरोधाभासी बोध आहे की प्रार्थनेकरिता पुरती सामुग्री गोळा करून घेऊन येणे योग्य, पण ती तिचा उपयोग करावा लागू नये एवढ्याचकरिता. म्हणजे भाकर घेऊन या पण ती खावी लागू नये एवढ्याकरिता घेऊन या. भाकर न घेता याल तर निमंत्रकाकडून भोजन कदाचित मिळणार नाही, आणि उपाशी राहावं लागेल. पण भाकर घेऊन याल, तयारी करून याल तेव्हा ही तयारी विसरायला लावण्यासारखं स्वादिष्ट भोजन प्रभू प्रार्थनेत खाऊ घालील.

म्हणूनच आपण मौन बसलो आहोत. या क्षणाची तयारी आपण केली होती. तो केव्हा येईल याची प्रतीक्षा केली होती. पण तो आला तर आता सर्व विसरून त्यात उडी घ्यायची आहे. राधिका शृंगार करीत होती. पूर्ण लक्ष देऊन आणि काळजी घेऊन शृंगार करीत होती, मिलनाची तयारी करीत होती. त्यात तिचा आनंद होता, तिची भक्ती होती, तिचं पुण्य होतं. पण मुरलीचे सूर कानांवर पडले रे पडले अन् ती सारं सोडून धावत सुटली. आता शृंगार कसला अन् वेष कसला अन् आभूषणं कसली ? तो समोर येऊन ठेपला आहे, आता खरा साज तो चढवील, खरी आभूषणं तो घेऊन येईल. राधेची तयारी उत्तम होती, पण श्रीकृष्णाचं दर्शन होताच ती तयारी गळून पडली. ही खरी प्रार्थनेची तयारी आहे.

※

प्रार्थनेला आपण रोज बसतो. सवय पडली आहे. ही सवय मोलाची आहे, कारण ती आपल्याला प्रार्थनेला घेऊन जाते. पण त्या सवयीत धोकाही आहे. सवय आहे म्हणून सवयीच्या ओढीनं आपण प्रार्थनेला जातो, यंत्रवत जातो, खाण्यासाठी किंवा झोपण्यासाठी किंवा शिकण्यासाठी जातो तसा मूढ भावानं जातो. रोजची प्रथा आहे, चाकोरी आहे, कर्मकांड आहे. पोथीतला पाठ वाचायचा, जे भजन क्रमानं येईल ते गायचं. काही उत्साह नाही, प्रतीक्षा

नाही, नवीनता नाही. आणि म्हणून प्रार्थना शुष्कपणे सुरू होते आणि परिणाम न करता संपते.

पण प्रार्थना हा काही कार्यक्रम नव्हे, जडक्रिया नव्हे. प्रार्थना मिलन आहे. दर्शन आहे. प्रार्थनेला भगवंताच्या आमंत्रणानं आपण येत असतो. म्हणून रोज नव्या उत्साहानं, तत्परतेनं आणि नव्या अनुभवाच्या आशेनं येणं योग्य. त्या आशेनं येऊ तेव्हा त्या आशेप्रमाणं होईल. 'प्रभू बोलावीत आहे' या भावनेत आणि या श्रद्धेत प्रार्थनेचं साफल्य आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कचेरीच्या दारापुढं दोन माणसं उभी आहेत. एक स्वत: होऊन आला आहे. त्याला स्वत:च्या स्वार्थाकरिता त्या अधिकाऱ्याला भेटायचं आहे, त्याच्यापुढं अर्ज करायचा आहे. त्याला माहीत नाही की, हा अधिकारी आपल्याला भेटीची वेळ देईल का, दिली तर आपलं म्हणणं ऐकेल का, ऐकलं तर मान्य करील का ? तो अस्वस्थ अन् चिंताग्रस्त मनानं उभा आहे. त्याच्या बाबतीत ही प्रतीक्षेची वेळ अप्रिय आणि कष्टदायक आहे. दुसरा माणूस उभा आहे, त्याला त्या अधिकाऱ्यानं या वेळी भेटायला बोलावलं आहे. चांगला संबंध आहे, पुष्कळ वेळा बोलावतो, आणि बोलावतो तेव्हा एखाद्या चांगल्या कामाकरिता बोलावतो असा अनुभव आहे. त्यामुळे तो मोठ्या उत्साहानं आला आहे. त्याला खात्री आहे की आपल्याला आत्ताच आत बोलावणं येईल, आणि आत गेल्यावर एखादी चांगली बातमी किंवा काम किंवा काही नाही तरी आनंदप्रद गप्पा-गोष्टी करण्याची संधी मिळेल. म्हणून तो आनंदी मनानं आला आहे. आणि अधिकाऱ्याच्या कचेरीच्या दारावर बसलेल्या चपराशाला त्यानं विश्वासपूर्वक सांगितलं आहे की, "साहेबांनी मला बोलावलं आहे."

साहेबांनी बोलावलं आहे या विश्वासानं आपण प्रार्थनेला बसलो आहो. आता दार उघडेल, आता तो परिचित असलेला आवाज ऐकू येईल की, "या, या, स्वागत आहे तुमचं. तुमचीच वाट पाहात होतो." आणि आत्ताच आपली प्रार्थना – खरी प्रार्थना – सुरू होईल.

# ३ : दर्शन

देवळात जायला आवडतं.

तसा तर परमेश्वर सर्वत्र आहे, प्रार्थना कुठंही करता येईल, परंतु देवळात भक्ती विशेष वाटते, ईश्वराशी अधिक आत्मीयता वाटते, कारण देऊळ हे देवाचं घर आहे. म्हणून देवळात जायला आवडतं, दर्शनाला जायला फार बरं वाटतं.

सारं जग ईश्वराचं आहे. कबूल. पण जगात अनिष्टं चालतात, पाप ठिय्या देऊन बसलं आहे, त्यामुळं ईश्वर कमी दिसतो. तो तिथं आहे, पण पाहुणा म्हणून आहे, प्राय: अस्वस्थ असल्यासारखा आहे. घरात झगडा आहे, बाजारात फसवाफसवी आहे, रस्त्यावर अश्लील दृश्यं आहेत, चौकात कुचाळक्या चालू आहेत; देवाचं तिथं अस्तित्व आहे पण ते दबलेलं आहे. दर्शन आहे पण अस्पष्ट आहे. दुनिया भ्रष्ट झाली आहे; तिच्यातील शहरात हिंसा आहे, तिच्या वाटांवरच्या दगडाधोंड्यांवर रक्त आहे, तिच्या हवेत विखार आहे, तिच्या अंतरी दु:ख आहे. दुनियेचा असा एकही कोपरा नाही की जिथं माणसाचा हात पोचलेला नाही, माणसाचं पाप पोचलेलं नाही. म्हणून अशा दुनियेत सरळपणानं, स्वस्थपणानं, शांतीनं नि सुखासुखी देव मिळत नाही, त्याची भेट होत नाही.

पण या भ्रष्ट दुनियेतही मानवानं देवाकरिता थोडी जागा ठेवली आहे. लहानसं देवघर असो की भव्य देवालय असो, पूजेची खोली असो की सोन्याचा गाभारा असो, थोडी जागा त्याच्यासाठी वेगळी ठेवली आहे; वर सांगितलेल्या पापापासून, निंदेपासून नि हिंसेपासून अलिप्त अशी ठेवली आहे; जिथं तो मालक म्हणून राहील; राजा म्हणून सिंहासनावर बसेल, देव म्हणून दर्शन देईल, आशीर्वाद देईल, वरदान देईल.

※

देवळाचं स्थान पवित्र आहे. दुरून त्याचा ध्वज फडकत असलेला दिसतो. ईश्वराची राजसभा आहे. राजाधिराजाचा राजवाडा आहे. दिल्ली राजधानीत परदेशी राजदूतांच्या कचेऱ्या आहेत. त्या प्रत्येकीवर त्या त्या देशाचा झेंडा फडकताना दिसतो. सर्वांना तो माहीत करून देतो की ही राजदूताची कचेरी

आहे. त्याच्या देशाचा जणू एक तुकडा आहे, त्या देशचे लोक आणि तिथलं सरकार यांचं आपल्या इथलं ते केंद्र आहे. देवळाचा ध्वज सुद्धा हेच सांगतो आहे. देवाची कचेरी. स्वर्गाचा तुकडा. आपल्या इथं त्याचा वास आणि त्याचं राहाण्याचं ठिकाण. पुण्यभूमी. म्हणून त्याच्यापुढं पायातली पादत्राणं काढून आत जायचं असतं. मनातून मलिन विचार नि अयोग्य स्मरण नि संसारातल्या चिंता काढून टाकून आत जायचं. पवित्र पावलांनी जायचं. पवित्र मनानं जायचं. देवाचं घर आहे, हे भान ठेवून जायचं. तो मान ठेवून जायचं. आणि आत जाताच त्या पवित्रतेचा नि मंगलमयतेचा अनुभव येतो.

देवळातली घंटा वाजते. मन जागृत होतं. साऱ्या वातावरणात त्या घंटेचा आवाज पसरतो आणि आपल्या स्पर्शानं वातावरणाच्या कणाकणाला शुद्ध नि चैतन्यमय बनवीत जातो. घंटेचा नाद वातावरणाचा ताबा घेतो, त्याच्यात प्राण फुंकतो, त्याला दीक्षा देतो. आणि त्या मंतरलेल्या वातावरणात येऊन त्याचा श्वास घेऊन, त्याने वेढला जाऊन दर्शनार्थी सुद्धा त्याची धन्यता आणि त्याची शक्ती यांचा अनुभव घेतो. देवळाची हवा सुद्धा पवित्र आहे. त्याचे दगड नि त्याची भिंत, त्याचे स्तंभ नि त्याची तोरणं, त्याची हवा नि त्याचा कळस सर्व पवित्र आहे. पावनकारी आहे. जग-व्यवहाराच्या मध्ये देऊळ हे एक शांतीचं बेट आहे, भक्तीचा मंडप आहे, कृपेचा कुंज आहे.

※

आणि देवळात मध्ये असणारी ती मूर्ती.

गाभाऱ्यातील अंधारात, दिव्याच्या थरथरत्या उजेडात, धूपाच्या सात्विक धुरात, स्थिर, शाश्वत, दृष्टीसमोर असणारी पण दूर दूर वाटणारी, पाषाणाची बनलेली पण दिव्य तत्त्वाची भासणारी, विश्वास नि क्षोभ, भक्ती नि भय एकाच वेळी प्रेरणारी ती परिचित नि परकी, प्रेम केलेली नि पूजा केलेली मूर्ती आहे. तिच्यापुढं हात आपोआप जोडले जातात, शिर नमतं, ओठ भगवंताचं नाव घेऊ लागतात आणि डोळे बंद होऊन श्रद्धेच्या उजेडात त्याचं दर्शन घेतात.

मूर्ती. देवाचं प्रतीक, धर्माचा आविर्भाव, भक्तीचं स्फुरण, शक्तीचा पिंड. मूर्तीत देवाचं स्वरूप आहे, त्याचा स्पर्श आहे, त्याचा वास आहे. सान्नि-

ध्याचा चमत्कार आहे, समीपतेची प्रतीती आहे. मूर्तीत शक्ती भरलेली आहे, विद्युत्प्रवाहाचा संचार आहे. तिच्या जवळ जाताच, देहानं नि मनानं तिच्या जवळ जाताच, त्या शक्तीचा अनुभव येतो, तिचा कंप जाणवतो, तिची धन्यता स्पर्शून जाते. तो इथं आहे. जवळ आहे. संकेतरूपानं, गुप्तवेषानं, अज्ञातवासात का असेना पण तो इथं आहे, जवळ आहे. आणि त्याचं हे केन्द्र, त्याचं लक्ष्य, त्याचा मध्य नि कणा ही धन्य मूर्ती आहे.

मूर्तीत दिव्यतेचा अंश आहे. आपल्या कारागिरांची परंपरा होती – प्रतिज्ञा होती – की देवाची मूर्ती बनवायची तर त्यात कला ओतायची आणि भक्तीही ओतायची. शिल्पी नुसता कसबी असला तर तो खरी मूर्ती बनवू शकणार नाही, त्याबरोबर तो खरा भक्त असला तरच तो हे काम हाती घेऊ शकेल, त्याला हाती घेऊ दिलं जाईल. पुढं मूर्ती बनविण्याचं काम सुरू करील तेव्हा मुहूर्त बघून तो ते सुरू करील. उपवास करून, पवित्र बनून पहिला टाकीचा घाव घालील आणि ज्या देवाची ती मूर्ती असेल तिच्या नावाचा जप करीत करीत तो ते काम शेवटपर्यंत चालवील. ही त्यांची रीत होती, त्यांचं व्रत होतं. कला होती तशी भक्ती होती, कसब होतं नि श्रद्धा होती. ती भक्ती आणि ती श्रद्धा, तो जपाचा चमत्कार नि ते उपवासाचं पुण्य टाकीच्या घावा-बरोबर त्या मूर्तीत शिरे, कोरलं जाई. आणि त्याचा प्रभाव आज दर्शनाला आलेल्या भक्तांच्यावर पडतो, परिणाम करतो.

मूर्तीची प्राणप्रतिष्ठा – श्रद्धेचा यज्ञ. भक्तीचा उमाळा.

त्या मूर्तीत कारागिराची निष्ठा आणि मंत्रांचं बळ, पुरोहिताचे विधी आणि दर्शनार्थीची साधना, शतकानुशतकांची परंपरा आणि लोकहृदयातील कथा, कला नि धर्म, श्रद्धा नि संस्कृती, इतिहास नि संस्कार भरलेले आहेत. पण त्याहीपेक्षा आणि त्याहून विशेष तिच्यात भगवंताचा आशीर्वाद नि वरदान, सिंहासन आणि वास आहे.

मूर्ती हे प्रतिबिंब आहे आणि प्रतीक आहे. साम्य आहे, पण हुबेहूब चित्र नव्हे, रूपक आहे, पण यथातथ्य वर्णन नव्हे. समजणाऱ्याला ती समजावते की भगवान सर्व काही पाहातो, म्हणून नित्य उघडे डोळे ठेवले आहेत, तो सर्व-समर्थ आहे म्हणून चार हात दिले आहेत. तो सर्वत्र उपस्थित आहे म्हणून त्याचं वाहन सज्ज आहे, तो दयाळू आहे म्हणून प्रसन्न मुद्रा दाखविली आहे.

संकेत आहे. भाषा आहे. तिचा संदेश पकडायचा आहे. तिचा बोध अंत:करणात साठवायचा आहे. तो संदेश आणि तो बोध घेऊन मूर्तीपुढं पूज्य भावानं बसून राहायचं आहे. आता डोळे बंद आहेत. कुतूहल जागवितील किंवा ध्यान चाळवितील ते रंग आणि ती अंगे आता दिसत नाहीत, मात्र अनुभवता येत आहेत, एकप्रकारे वातावरणातून झेलता येत आहेत. ती शक्ती आहे, ती सान्निध्य आहे. ती भगवान् आहे. धन्य ती मूर्ती. धन्य तो प्रेममय भगवान्.

※

भक्त येतात नि जातात. दर्शन घेत जातात. नमस्कार करीत जातात, स्पर्श करीत जातात. आणि मूर्ती शाश्वत, सनातन, स्थिर. नवे भक्त येतात, रोज येतात आणि त्यांचं पुण्य त्या मूर्तीत जमा होत जात असतं, त्यांच्या श्रद्धेनं, भक्तीनं अन् सिद्धीनं ती मूर्ती समृद्ध बनत जात असते.

भगवान् इथं आहे, जवळ आहे, समोर आहे. मूर्तीचा डोळ्यांकरिता हा संदेश होता. आता देवाचं हृदयासाठी हे सरळ सांगणं आहे. तो समोर आहे. ध्यान धरीत आहे. कोण कोणाचं ध्यान धरतं ? कोण कुणाचं दर्शन घेतं ? आता भक्त आणि भगवान एकमेकांसमोर आहेत. एकमेकांजवळ. एकमेकांच्या ध्यानात. एकमेकांच्या प्रेमात. देवळाच्या आसऱ्याला. मूर्तीच्या छायेत.

घंटा वाजते. धूप जळू लागतो. मंत्रोच्चार चालू होतो. पायऱ्यांच्या गुळगुळीत दगडांवर श्रद्धाळूंच्या पायांची चपचप आहे. हृदयात शांती, धन्यता आणि आनंद यांचा विलक्षण अनुभव प्रतीत होत आहे.

देवळाचा आशीर्वाद आहे. मूर्तीचा प्रसाद आहे.

खरंच, देवळात जायला बरं वाटतं. दर्शनाला जायला बरं वाटतं. देवळाचा आसरा आणि मूर्तीची ऊब नसती तर हृदयातली ही धर्माची पणती केव्हाच विझून गेली असती !

▭

# ४ : आरती

डोळे मिटलेले आहेत, तरी सारं दृश्य
दृष्टीसमोर आहे.
मूर्ती आणि दीप. फुलं आणि ताट.
पुजारी आणि भक्त. मधुर घंटारव
संगती. मंद सुगंधाचा दरवळ. पूजेची वेळ आहे. आरतीचा विधी आहे.

पुजाऱ्याच्या हाती ताट आहे. ताटात दीप आहे, फुलं आहेत, कुंकू आहे. आणि पुजारी ते ताट लयीनिशी, ध्यान धरून, कलायुक्त रीतीनं गोल फिरवीत आहे, डोक्यापासून पायापर्यंत मोठं वर्तुळ करून फिरवीत आहे. सोबत मंत्रोच्चार चालला आहे. वातावरणात तेज, सुगंध नि स्वरांची रांगोळी काढली जात आहे.

हे उपासनेचे एक अंग आहे. सेवेची एक क्रिया आहे. अंतःकरणात भक्ती आहे, आणि ती दर्शविल्यावाचून राहावत नाही. देवाविषयी प्रेम नि श्रद्धा आहे, आणि त्याला सांगितल्यावाचून राहत नाही. ती मनातच सांगावी, एकांतात सांगावी हे योग्य अन् आवश्यक खरं, पण पुरेसं वाटत नाही. प्रकट स्वरूपातही सांगावीशी वाटते, जगाच्या पुढ्यात सांगावीशी वाटते, इतर भक्तांच्या मेळाव्यात सांगावीशी वाटते. तेवढ्यासाठी गोळा झालो आहोत, आणि प्रत्येकाच्या हृदयात जो भाव आहे तो सगळे मिळून व्यक्त करीत आहोत. देवळातली आरती ही सामूहिक क्रिया आहे. भक्तवृंदाची साधना आहे. तिचं गुंजन नि तिचे सूर देवळातून बाहेर पडून त्याच्याबाहेर चहूंकडे पसरतात, सगळ्या गावात पोहोचतात, आणि अशा रीतीनं ती काही थोड्या प्रतिनिधींच्या हातून घडलेली सगळ्या गावाची पूजा बनते.

आरतीमध्ये भक्ती आहे. प्रेम असतं तिथं पाहातच राहावं असं वाटतं. दृष्टी तृप्त होत नाही. डोळे थकत नाहीत. आणि भक्तीत प्रेम आहे म्हणून आरती करता करता भक्त टक लावून पाहात राहातो. मूर्तीकडे पाहातो, इष्टदेवतेकडे पाहातो, हृदयात विराजलेल्या भक्तवत्सल भगवंताकडे पाहातो धन्यतेनं पाहातो. मंत्रमुग्ध होऊन पाहातो. त्या दृष्टीत, त्या ध्यानात, त्या दर्शनात श्रद्धा नि भक्ती आहे, समर्पण नि शरणागती आहे.

※

आरतीत अनंतत्व आहे. गोल ताट, गोल गती, गोल फेरा. अखंड वर्तुळ. अनंत चक्र. प्रारंभ नाही नि अंत नाही. युगांची उपासना. चक्राकार यज्ञ. आरती काही क्षणच चालत असेल, पण अनंततेचा अनुभव देते, थोड्या वेळात ती पूर्ण होते, पण आत्म्याच्या स्थिर, शाश्वत आणि चिरस्थायी अवस्थेची ओझरती ओळख देऊन जाते. पुजारी ताट फिरवितो. किती वेळा फिरवितो ? त्याची मोजदाद नाही. कुठून सुरू करतो ? त्याचं भान नाही. पण तो फिरवितो, गोल गोल फिरवितो, स्थिर, धिम्या, सतत गतीनं फिरवितो एवढंच लक्षात येतं. मूर्तीपुढं हीच गती शोभते. आणि आत्म्याच्यापुढं देखील हीच गती शोभा देते.

पृथ्वीच्या आसपास चंद्र फिरतो. नित्य, सतत, अचूक. गोल गोल, अनंत पावलांनी. ती सुद्धा आरतीच नाही का ? सृष्टीची आरती. आकाशाचा कर्मविधी. अशीच सूर्य नि अनंत तारका यांची अनंत आरती. ब्रह्मांडाची आरती. त्यातही अनंततेचं दर्शन आहे. आपलं लहानसं वर्तुळ त्या विशाल वर्तुळाचं प्रतिरूप आहे. आपण सुद्धा त्या ब्रह्मांडाच्या आरतीत सामील होतो, त्याच्या संगती अनंतत्वाची दीक्षा घेतो. मग, त्या क्षणाची धन्यता घेऊन जीवनाच्या रोजच्या व्यवहारात उतरू. धांदल, चिंता, गडबड नि धावाधाव असलेल्या या व्यवहाराच्या जगात येऊ, तेव्हा हे पुण्यस्मरण आणि या शीतल अनुभवाने मनात उत्पन्न झालेला समभाव आणि हृदयाची शांती जतन करून ठेवू. आरतीचा भाव आम्ही संसाराच्या गडबड-धांदलीत आणू शकू.

※

आरतीत रक्षण आहे, दृष्ट काढण्याचा भोळसर समज नाही. जगातल्या लुच्चेगिरीपासून रक्षण मिळविण्याची भावना आहे. त्या दृष्टीनं व्यक्तीपुढं सुद्धा आपण आरती ओवाळतो. शुभ प्रसंग आहे, नवं काम हाती घेतलं आहे, लग्नाचा दिवस आहे, परदेशी जाण्याचा मुहूर्त आहे, अशा वेळी आरतीचा आपण अवलंब करतो. ते वधु-वर, तो नवयुवक, तो साहसवीर यांच्यापुढं केवढे प्रसंग आहेत, केवढी कसोटी आहे ! या दुष्ट जगात या नाजूक तरुणाचं काय होईल! रक्षण हवं आहे, अशुभाचा प्रतिकार व्हायला हवा आहे, ही भावना त्याला आरती ओवाळण्यात आहे, ती प्रकाशाची ढाल. अभयदानाचा मंत्र. प्रसादाचं वर्तुळ.

त्याच्यावर प्रेम करणाऱ्यांचे आशीर्वाद त्या विधीत आहेत. विधीचं पुण्य आहे, ईश्वराचं वरदान आहे. ते घेऊन तो युवक पुढं जाईल, विश्वासानं लढेल, जिकेल आणि जिवंत राहील, त्या शुभेच्छेच्या आरतीच्या प्रतापानं विजय घेऊन परत येईल.

※

आरतीत पूजा आहे, भक्ती आहे, अनंतत्वाचं दर्शन आहे आणि रक्षणाचं वचन आहे आणि या सर्व भावांच्या साररूपानं नि फलरूपानं आरतीत देवाशी एकरूप होण्याची भावना आहे. ती ज्योत देवाच्या पुढं फिरली, त्याच्या अंगोपांगावर फिरून पवित्र बनली. मूर्तीच्या अंगोपांगाचं दर्शन तिनं आपल्याला करवून दिलं. या ज्योतीत आता भगवंताचा अंश आहे, त्याचा वास आहे. तिच्या प्रकाशात, तिच्या चैतन्यात, तिच्या उबेत नि तिच्या चपलतेत भगवंताचं अस्पष्ट दर्शन आहे. ही ज्योतच आता देवस्वरूप आहे आणि ती आपल्याजवळ येत आहे. आरती संपल्यानंतर, विधीची पूर्णाहुती म्हणून ती आपल्याकडे येते. पुजाऱ्याच्या हातातून ती येते आणि तिला आपल्या हातांचा स्पर्श आपण करतो. ज्वालेचा स्पर्श शीतल असू शकतो, अशी कल्पना तरी होऊ शकते का ? आपण दोन्ही हातांनी त्या मंगल ज्योतीला स्पर्श करतो आणि आपल्या अंगावर ते हात फिरवितो. भगवंताच्या अंगाच्या स्पर्शानं पावन झालेली ज्योत आपल्या अंगोपांगांना आपण लावतो. प्रकाशाचा अभिषेक. तेजाचं शिंपणं. आणि ती ज्योत देवामधून आली होती, देवस्वरूप होऊन आली होती. ती आता माझी बनते, माझ्यात सामावून जाते. म्हणजे देवाला नि मला तिनं एक बनवून टाकलं. हाच उद्देश होता, हीच धन्य युक्ती होती. एकतेचा संदेश घेऊन ती ज्योत आली होती आणि एकतेचा साक्षात्कार देऊन ती जाते. भक्ती तरी हेच मागत होती. पूजा तरी हेच शोधीत होती. अनंताचं आवाहन हेच बोलत होतं आणि रक्षणाची गरज यातच मागत होती. चारी प्रवृत्तींचा शांत संतोष झाला. भगवंताशी एक झालो अर्थात् पुरतं रक्षण मिळालं, अनंततेत सामावून गेलो, आपली भक्ती सफळ झाली, आपली पूजा कामी आली. सर्वांच्या मुळाशी एकता होती. सर्वांच्या रूपानं ही ज्योत होती. ही ज्योत आली, आता सर्व काही झालं. एकता आली तेव्हा सर्व काही मिळालं.

१९२ ... ६-२।१२ ... क्र. ३०६

श्रद्धेनं ही ज्योत शिरी घेऊ या. तिच्या प्रकाशानं सारं जीवन प्रकाशमय होईल. तिच्या ज्वालेत कर्माचं इंधन जळून जाईल. भक्तीची ही ज्योत आहे. आरतीची शिखा आहे.

रोज आरती होऊ दे. रोज तिचा घंटानाद आणि तिचे सूर गल्लोगल्लीत पसरू देत, आधुनिक, विलासी, नास्तिक शहराच्या कोनाकोपऱ्यात ते पसरू देत. रोज तिच्या स्वरानं, तिच्या धूपानं, तेजानं मानवाची कुकर्मं पुसून जाऊ देत, समाजाचा अधर्म विसरला जाऊ दे, आणि रोज तिच्या अनुभवानं, तिच्या आशीर्वादानं, तिच्या वरदानानं आपलं जीवन शुद्ध होऊ दे, पवित्र होऊ दे, धन्य होऊ दे.

□

# ५ : प्रसाद

स्वाद मधुर आहे. तोंडात आणि
अंतरात. जिभेला त्याचा स्पर्श होतांच
क्षणभरात तोंड गोड झालं आणि
हृदयात धन्यता पसरली.

त्या घासात चमत्कार आहे. त्या मिष्टान्नाच्या तुकड्यात मोठी शक्ती आहे. जीवनातील कटुता विसरायला लावण्याची शक्ती आहे. अंतरातील श्रद्धा पुष्ट करण्याची शक्ती आहे.

हा प्रसाद आहे. देवळात मिळालेला प्रसाद. देवाचा आशीर्वाद लाभलेला प्रसाद, संतपुरुषाच्या हाती प्राप्त झालेला प्रसाद. तो दर्शन घेतल्यानंतर मिळाला, आरतीची फलश्रुती म्हणून मिळाला, यज्ञाच्या पूर्णाहुतीच्या रूपानं मिळाला. तो भक्तिपूर्वक हाती घेतला गेला, तोंडात टाकला गेला, गिळला गेला. आणि एक क्षण डोळे मिटून त्याचा मधुर परिणाम मनात आणि देहात पसरू दिला गेला

प्रसाद. भक्तीचं फळ, कृपेचं वाहन, श्रद्धेचा पुंज, धरतीची पैदास, माणसाच्या हाताची बनावट, देवाच्या प्रसन्नतेचं तो प्रतीक आहे. मिष्टान्नाच्या त्या लहानशा तुकड्यात हृदयाचे भाव आणि धर्माचे संस्कार ठासून भरले आहेत.

प्रसाद प्रथम माणूसच देवापुढे ठेवतो. त्यानं केलेलं ते समर्पण आहे, नैवेद्य आहे. भक्त श्रीफळ न आणील तर पुजारी खोबरं देणार नाही. माणूस अर्घ्य न देईल तर देव प्रसाद हाती ठेवणार नाही. प्रसादाचा नारळ माणसाच्या शेतात उगवतो, प्रसादाचे पेढे माणसाच्या चुलीवर बनतात. पुरुषार्थावाचून कृपा अवतरत नाही. मेहेनतीखेरीज प्रसाद मिळत नाही. माणसाचे श्रम पाहिजेत, उद्यम पाहिजे, शेती पाहिजे, मजुरी पाहिजे. माणसाच्या हाती तो नैवेद्याचा नारळ पाहिजे. तो घेऊनच दर्शनाला यायचं असतं. त्यावर भगवंताचा आशीर्वाद उतरतो आणि धरतीच्या त्या फळाचा दिव्य प्रसाद बनतो.

*

ते श्रीफळ समर्पण करायचं हे कोणाचं प्रतीक आहे बरं ? हा नारळ माझ्या हाती आहे तो आता मी पुजाऱ्याच्या हातात देणार आहे. तो कोणाचं

स्थान घेतो बरं ? तो माझं स्थान घेतो, माझं प्रतीक – माझा प्रतिनिधी तो बनतो. मी मला स्वत:ला प्रभूच्या चरणी अर्पण करू इच्छितो हे माझ्या हातातलं श्रीफळ सांगत आहे. माझ्या या जड देहाला मी प्रभूच्या चरणी स्थूल अभिनयानं ठेवू नाही शकणार. अन ठेवला तरी तो पुजारी त्या देहाला घेऊन काय करणार ? म्हणून त्याच्या बदली हे प्रतीक ठेवतो, हा संकेत ठेवतो– नारळाच्या रूपानं. त्यात ही भावना आहे. हा नारळ म्हणजे मी. नारळाचा नैवेद्य म्हणजे आपल्या जीवनाचं अर्पण. देवा, तुम्ही हे घ्या, तुम्ही ते आता चालवा आणि अजून मलाच जर ते चालवायचं असेल तर तुमच्या नावानं, तुमच्या पद्धतीनं चालवीन. ही प्रतिज्ञा आहे. ही शरणागती आहे. अंत:करणात ही भावना असेल तरच भगवान तो नैवेद्य स्वीकारील, आणि तरच त्याचा प्रसाद सात्त्विक, पौष्टिक, पावनकारी होईल.

ते श्रीफळ आता माझ्या हातातून गेलं. ते माझं राहिलं नाही. भगवंताच्या हाती गेलं. त्याचं ते झालं. म्हणजेच मी त्याचा झालो. माझं मीपण राहिलं नाही. ही पूजेची प्रक्रिया आहे. यज्ञाचं हे रहस्य आहे. यज्ञात अर्घ्याचं हे परिवर्तन होतं– सूक्ष्म आणि गहन. मार्मिक आणि निश्चित. डोळ्यांना दिसणार नाही असं, पण श्रद्धेनं पकडता येईल असं. ते श्रीफळ पवित्र बनलं, पूज्य बनलं. त्याच्यावर आता माझा अधिकार नाही. देवळापुढच्या दुकानदाराकडून मी ते खरेदी केलं होतं– पैसे देऊन–त्या वेळी ते माझं होतं. मनात असतं तर मी ते खाऊ शकलो असतो, किंवा फेकूनही देऊ शकलो असतो. माझं होतं म्हणून माझ्या मर्जीचा विषय होता. पण आता ते माझं नाही, देवाचं आहे. माझ्या हातात नाही, पुजाऱ्याच्या हातात आहे. माझं जीवन देवाच्या हाती आहे, माझं अर्पण त्याच्याशी एकरूप होऊ लागलं आहे.

पुजारी श्रीफळ हातात घेतो. जरा साफ करतो. मग फोडतो. पाणी ओतनो. श्रीफळाचा श्वेत, निर्मळ, मृदु गर मोकळा करून मूर्तीच्या पुढं ठेवतो. आणि त्याचा थोडा भाग परत तो भक्ताच्या हातावर ठेवतो.

हा प्रसाद. मनुष्यानं मनात धरलेला, देवानं स्वीकारलेला–आपला म्हटलेला आणि आपला म्हणून परत दिलेला नैवेद्य तो हा प्रसाद. एवढ्या विधीनंतर त्या नारळात केवढा फरक पडला ! दिलं होतं झाडाचं फळ, आणि पदरी पडतं स्वर्गाचं वरदान, दिली होती बाजारची वस्तू, आणि हाती पडतो

ईश्वराचा प्रसाद, दिलं होतं खाण्याचं मिष्टान्न आणि मिळतो हृदयात उतरविण्याचा आशीर्वाद. होय, नारळ आपटला होता खरा. प्रहार झाल्यावाचून परिवर्तन थोडंच होत असतं ? माझा प्रतिनिधी झालेल्या नारळावर जागृती, वैराग्य, बलिदान यांचा प्रहार पडला. प्रहार झाल्यावाचून नारळाचे दोन तुकडे होणार नाहीत, त्याचा गर बाहेर येणार नाही अन् त्याचा प्रसाद बनणार नाही. संसाराचा धक्का लागल्यावाचून माणूस जागा होऊन उठणार नाही, सुधारणार नाही, त्यागाला तयार होणार नाही. म्हणून पूजेत हा विधी आहे, यज्ञात हा संकेत आहे. समर्पण आहे म्हणून नवजीवन आहे; प्रहार आहे म्हणून चेतना आहे. श्रीफळाचं खरं सार्थक उघडं होण्यात, फुटण्यात, अंतरीचं पाणी बाहेर पडण्यातच आहे. प्राण अर्पण करण्यानंच प्रसाद बनण्याचा त्याला अधिकार येतो.

आणि तो प्रसाद हातात येतो. सगळा नाही, त्याचा थोडा भाग. का ? कारण दुसरा भाग–मोठा भाग देवाजवळच राहातो. आता आपण त्याच्याबरोबर तो चाखण्याकरिता बसलो आहो, देव आणि आपण जणू भोजन करायला एकत्र बसलो आहो. प्रसादाचं भोजन. म्हणून त्याचा भाग मोठा, आपला लहान. त्याची पाळी पहिली, आपली मागाहून. पण आहेत एकाच फळाचे दोन तुकडे, एकाच भोजनाच्या दोन बैठकी. भगवान स्थूल हाताने हा प्रसाद घेणार नाही, त्याच्या नावानं त्याचा पुजारी घेईल. पण खरं आहे देवाचं ताट आणि त्याचा भाग. तो आणि आपण. भगवान आणि भक्त. एकच जेवणावळ, एकच पंगत. आता या भोजनव्यवहारानं देवाचं अन् आपलं नातं जमलं. देवाच्या कुटुंबातले आपण आहोत हे सिद्ध झालं. आपण पुढं केलेलं फळ त्यानं स्वीकारलं, त्यानं वाढलेला प्रसाद आपण खाल्ला. प्रसादात एकरूपतेचा संकेत आहे, अद्वैताचा संदेश आहे.

हे अद्वैत आणि ही एकरूपता मूळ देवाशी आहे, पण त्यातून माणसामाणसांमधली एकताही खाली झरते. प्रसाद एकट्यानं खायचा नसतो. एकांतात जाऊन खायचा नसतो. प्रसाद वाटून खायचा, दुसऱ्याच्या बरोबर खायचा. त्यातून दुसऱ्यांच्या बरोबरही ऐक्य आणि आत्मीयता बांधली जाते. ज्ञातिभोजन आहे. कुटुंबमेळावा आहे. एकत्र जेवलो तेव्हा आता एकत्र जगायचं. देवाचा प्रसाद घेतला अर्थात् देवाच्या कुळाचे झालो. आता सगळे आप्त

नि सगळे भाऊ. सर्वांविषयी प्रेम आणि सर्वांशी मैत्री. हा प्रसादाचा प्रताप आहे, यज्ञाचा प्रभाव आहे. कोणाविषयी वैरभाव असेल तर प्रसाद नाही घेता येणार. कोणाशी भांडण असेल तर देवाचं भोजन नाही स्वीकारता येणार. प्रसादात मेळ करण्याचा गुण आहे, एकतेचा संस्कार आहे. प्रसाद अंतःकरणात प्रेम ठेवून घेतला पाहिजे, सर्वांशी सलोखा ठेवून आणि शांती राखून घेतला पाहिजे. आणि तो अशा रीतीनं, अशा भावनेनं घेतला तर सलोखा, शांती, प्रेम आणि ऐक्यभाव सांभाळण्याची आणि विस्तारण्याची त्याच्यात जी शक्ती आहे ती विकसित होईल.

प्रसाद आला तसा घेतला असं चालणार नाही. जाणीव ठेवून, जबाबदारीनं घेतला पाहिजे. तो आत्म्याचं समर्पण आहे, देवाची देणगी आहे, ऐक्याचा विधी आहे, अद्वैताची अंमलबजावणी आहे.

आणि एकदा प्रसाद घेतला म्हणजे आता इतर सर्व खाण्याच्या वस्तूंत सुद्धा आपण प्रसाद पाहू, रोजच्या आहारात आणि सामान्य भोजनातही प्रसादाचा भाव पाहू, प्रसादाचा स्वाद घेऊ. ते अन्न सुद्धा आपल्या श्रमानं आणि देवाच्या आशीर्वादानं मिळालं आहे. ते धान्य आणि ती भाजी, ती मिठाई आणि ते पक्वान्न हे आपल्या श्रमाचं फळ आहे, भगवंताच्या कृपेचं दान आहे. म्हणून रोजची खिचडी सुद्धा प्रसाद आणि कोरडी भाकर हा सुद्धा प्रसाद. घरचं भोजनही प्रसाद आणि कचेरीतला नाश्ता हा ही प्रसाद. ह्यातही ती भावना आहे, तो विधी आहे, तो धर्म आहे. त्यातही समर्पण आणि कृतज्ञता, शक्ती आणि पुष्टी, एकता आणि मैत्री हे भाव आहेत. तोही पवित्र आहे. देवळातला प्रसाद घेऊन घरचा प्रसाद घ्यायला लायक बनू या. म्हणजेच तोही प्रसाद आहे हे भान आणि तो मान ठेवून घ्यायला शिकू या. तेव्हाच खरोखर त्या प्रसादाचा गुण दिसेल, त्याचा मंगलकारी परिणाम साऱ्या जीवनावर पसरेल. श्रद्धा नि भक्ती, बलिदान नि शरणागती, स्नेह आणि शांतीचे वरदान तो देईल. देवाचा प्रसाद देहाचा आणि मनाचा सात्त्विक आहार बनेल.

तोंडात अजून तो स्वाद आहे. मधुर स्वाद. प्रसादाचा स्वाद. संसारातील कडवटपणावर हे कायमचं औषध होईल.

# ६ : स्वस्तिक

घरापुढच्या अंगणात स्वस्तिक आहे. पाऊल ठेवताच कळतं. म्हणून पाऊल काळजीपूर्वक ठेवायचं. अलगत बाजूला ठेवायचं, म्हणजे आकृती बिघडायची नाही, तिच्या रेखा पुसायच्या नाहीत. त्यावर नजर ठेवून आत जायचं. त्याची मंगलमयता अंतःकरणात उतरू द्यायची नि घरात प्रवेश करायचा.

स्वस्तिक हे मांगल्याचं प्रतीक आहे. आशीर्वादाचा संकेत आहे. स्वस्तिक हे चिन्ह आहे.

ज्या घरावर हे शुभ चिन्ह आहे त्या घरात विशेष अर्थानं नि विशेष शक्तीनिशी देवाचा वास असतो, आणि म्हणून विशेष भान नि मान ठेवून त्या घरात प्रवेश करणं योग्य. ती ईश्वराची मुद्रा आहे. ईश्वराच्या सान्निध्याचं ते चिन्ह आहे.

आकृती तशी सरळ आहे. लहान मुलगा सुद्धा ती काढू शकेल. घरातली मुलगी आज सकाळी ते काढीत होती तेव्हा ते काढताना तिला काही वेळ नाही लागला. एक रेघ उभी नि एक आडवी. आणि काटकोन करून चार दिशांना चार भुज. सरळ नि प्रमाणबद्ध. समान नि समतोल. आणि त्याचं सारं ध्यान न् वेग न् वजन न् गती त्याच्या मध्याच्या छेदबिंदूवर केन्द्रित होतं. त्या नाभिकमळातून चारी दिशांना सर्जक शक्ती पसरते आणि सगळ्या सृष्टीला मंगलमय करून टाकते.

स्वस्तिक लहानसं आहे पण विशाल आहे. अंगणात सारविलेल्या जमिनीवर ते काढतात, पण सबंध विश्वाला ते कवटाळतं. वामनाचा अवतार आहे पण साक्षात् भगवान् विष्णूचं स्वरूप आहे. स्वस्तिकात रक्षण आहे, पावनशक्ती आहे, अभयमुद्रा आहे. कारण त्याच्या त्या चार सूक्ष्म रेखांत भगवंताचा सांकेतिक साक्षात्कार आहे.

ईश्वराचा लक्षणात्मक गुण आहे सर्वव्यापकता. तो सर्वत्र आहे. आत अन् बाहेर, जवळ अन् दूर, पृथ्वीवर अन् ब्रह्मांडात, हृदयात अन् पाषाणात. त्याचा स्पर्श सर्वत्र आहे, त्याची दृष्टी सर्वत्र आहे, त्याचं तत्त्वच सर्वत्र आहे. आणि त्याचा हा गुण आपली बुद्धी, आपली मर्यादित मानवबुद्धी ग्रहण करू

शकत नाही. ईश्वराचा आपण विचार करतो तेव्हा त्याला आपण देशकालात बांधतो, डोळ्यांसमोर त्याला उभा करतो किंवा वादळाच्या सिंहासनावर बसलां आहे असं कल्पितो; कोणत्या ना कोणत्या रूपात पण कल्पितो. त्याचं चित्र काढतो तें अमक्या भिंतीवर टांगण्याकरिता, आणि त्याची मूर्ती बनविनो ती अमुक देवळात बसविण्याकरिता; म्हणजे तिला अमुक इतकी जागा लागेल, अमुक अंतरावरून नी दिसेल अशा कल्पनेनं. भावना खरी आहे आणि सुंदर आहे. देवाची चित्रं पाहिजेत, मूर्ती पाहिजेत, पण ती चित्रं किंवा त्या मूर्ती बनविताना, पाहाताना अन् पूजताना अंतःकरणाला थोडं दुःख होतं, थोडी खुटखुट वाटते की देवाचं ध्यान धरण्याकरिता मूर्ती बनवावी लागली हे केवढं दुर्भाग्य !

आणि त्यावर हा उपाय सुचला. अनेक शतकांपूर्वी, युगांपूर्वी तत्त्वदर्शी ऋषिमुनींना हा संकेत सुचला. अमूर्त आणि अरूप. सरळ आणि मार्मिक. गहन आणि सूचक. एक गाठ नि चार रेषा. एक केंद्र आणि चार भुज. कमीत कमी रेखाटलं आणि जास्तीत जास्त सांगितलं. त्या चार दिशांच्या गाठोड्यात पृथ्वी आणि आकाश यांना बांधून घेतलं आणि त्या केंद्राच्या आसऱ्याला आणलं. ईश्वराचा संकेत देऊन त्यांना पावन केलं. आणि त्यांना आठवण करून देण्याकरिता, जाणीव करून देण्याकरिता या चिन्हानं त्यांना मुद्रित केलं. जणू त्याच्या पायाचा ठसा आणि त्याच्या नावाचा संकेत ! स्वस्तिकानं दिशांचं पूजन आहे, अवकाशाची आरती आहे, ईश्वराच्या समीपतेचा संदेश आहे.

लिहायला सुरुवात करायची होती. कोरा कागद घेतला, पुढं ठेवला. या लिखाणाकरिता देवाचा विशेष आशीर्वाद मागायचा होता म्हणून मनात त्याचं स्मरण केलं, कृपा याचिली, विनंती केली. आणि तो भाव कागदावर उतरण्याकरिता, दुसरं काही लिहिण्यापूर्वी, कागदाच्या माथ्यावर, सुरेख वळणानं स्वस्तिकाची लहानशी आकृती काढली. मग पुढं लिहायला लागण्यापूर्वी त्या स्वस्तिकाकडं क्षणमात्र ध्यानपूर्वक पाहात राहिलो.

आकृती लहान होती. कागदावरची फार थोडी जागा तिनं व्यापली होती. अगदी वरच्या बाजूला, मध्यात. पण तिथून ती जणू सबंध कागदाचा कबजा घेऊन बसली आहेस वाटलं तिच्या त्या रेषा कल्पनेत दूर दूर जात

होत्या, अगदी खालपर्यंत नि डाव्या अन् उजव्या कडांपर्यंत जात होत्या, अदृश्यपणे पसरत होत्या आणि सबंध कागदाला आपल्या पुण्यपावन आलिंगनात घेत होत्या. सबंध कागद जणू स्वस्तिकमय बनला, आणि आता त्यावरचं लिखाण खरोखर चांगलं असेल, योग्य असेल याची खात्री झाली.

स्वस्तिक लहान, पण प्रभाव मोठा. रेघा आखूड, पण दिशा अनंत. आणि स्वस्तिकात हेच रहस्य आहे. त्याच्यात दिशा आहेत, अनंतता आहे, सर्वव्यापकता आहे. स्वस्तिकात गती आहे, वेग आहे. ते कागदाच्या कोपऱ्यात बसून राहात नाही, तर सबंध कागदच कवळून घेतं. ती एखादी जड आकृती नाही, निश्चेतन ठसा नाही. ते जिवंत आहे, धावतं आहे, पसरणारं आहे. बंदिस्त पाणी नाही, वाहता झरा आहे. बंदिस्त हवा नाही, वाहता वारा आहे.

घराच्या उंबऱ्यावरही ते स्वस्तिक आहे आणि त्याचा सुद्धा तो गुण आहे, तो धर्म आहे. ते सुद्धा केवळ उंबऱ्यावरच नाही तर सगळ्या घरात आहे. आत अन् बाहेर, अंगणात अन् खोलीत, स्वयंपाकघरात अन् बगीच्यात त्याचा प्रभाव आहे, त्याची छाया आहे. उंबऱ्याचं पूजन म्हणजे सगळ्या घराचं पूजन. तो ओलांडून लोक आत जावोत की बाहेर जावोत, त्याच्या आजूबाजूला बोलणं-चालणं होईल, जीवन चालेल त्या सर्वांवर त्याची दृष्टी. आणि त्या सर्वांना त्याचा आशीर्वाद. स्वस्तिकाचे हात उंबऱ्याच्या खांबात, लाकडात पसरतात, घराचा सबंध प्रदेश भरून टाकतात, त्याच्या वातावरणाला दीक्षा देतात, सबंध घराला पावन करतात. उंबऱ्याचं हे पूजन आहे, दिशांचा यज्ञ आहे.

स्वस्तिकात व्यापकत्वाचा गुण आहे, तसाच त्याबरोबर एकत्वाचाही गुण आहे. चारी दिशांकडे फाकण्याची वृत्ती आहे, आणि एका बिंदूशी एकत्रित होण्याचा आग्रह आहे. ईश्वर सर्वत्र आहे याचा संदेश त्यात आहे, आणि सर्व ईश्वरात आहे हा बोधही त्यात आहे. रेषांबरोबर मध्यबिंदू. दिशांच्या मध्ये उगमस्थान. चार भुजांच्या केंद्रस्थानी एक हृदय. विशाल आणि एकाग्र. विश्व नि बिंदू, डहाळ्या नि बीज. स्वस्तिक हे व्यापकतेचं प्रतीक आहे, आणि त्या-बरोबरच सांधण्याचंही प्रतीक आहे. उर्ध्व आणि सम क्षितिज. शाश्वत नि क्षणिक, दिव्य नि मानवी. सर्व एका केंद्रात, एका बिंदूत. स्वस्तिकात बाहेरची गती होती, त्यात अंतराकडीलही गती आहे. दिशांपर्यंत घेऊन जाणारी शक्ती होती आणि

केंद्रात मामावून घेणारी वृत्ती सुद्धा आहे. केंद्रगामी वेग आहे. गुरुत्वाकर्षण आहे, अद्वैत आहे.

म्हणून स्वस्तिक सर्वत्र काढावं, सर्वत्र पुजावं. कागदावर स्वस्तिक आणि वहीवर स्वस्तिक. घराच्या अंगणात स्वस्तिक आणि घरच्या उंबरठ्यावर स्वस्तिक. नवजात शिशूच्या वस्त्रावर स्वस्तिक आणि वधूच्या अंतरपाटावर स्वस्तिक. पूजेत स्वस्तिक आणि सजावटीत स्वस्तिक. आणि विशेप म्हणजे मनावर स्वस्तिक अन् हृदयावर स्वस्तिक. त्याच्या विचारांवर, कल्पनांवर, ऊर्मीवर अन् योजनांवर स्वस्तिकाची छाप न् प्रेरणा न् भावना. वहीखात्याच्या पानावर स्वस्तिक काढलं म्हणजे आत वाटेल तो खोटा हिशेब लिहायला अभय-दान मिळालं असं नाही. उलट पहिल्या पानावर स्वस्तिक आहे तर आता त्याच्या साक्षीनं अन् प्रतापानं पानापानावर खरं लिहिलं जाईल, पुरतं न् निश्चित लिहिलं जाईल. घराच्या अंगणात स्वस्तिक भरलं तर घराच्या सोप्यात. खोलीत वाटेल ते वेडंवाकडं वर्तन करायला परवाना मिळाला असं नाही. उलट बाहेर स्वस्तिक आहे म्हणून आता त्याला शोभेल अन् साजेल असं वर्तन आत ठेवण्याचा आग्रह राहील. स्वस्तिक भरल्यानं जबाबदारी कमी झाली नाही, वाढली. वहीखात्याचं पूजन केल्यानं खरा हिशोब लिहिण्याचं कर्तव्य सुटत नाही, त्यानं बांधलं जातं. आणि गंमत अशी आहे की हा आदर्श पाळण्याकरिता स्वस्तिकातच आधार मिळेल अन् शक्ती मिळेल. देवाचं सान्निध्य, मंगलाची व्यापकता, दिशांचा धर्म आणि सृष्टीची एकता हा बोध त्या सरळ आकृतीत आहे. आणि जीवन पवित्र, प्रामाणिक, शुद्ध आणि पुण्यमय राखण्याची त्या बोधात प्रेरणा आहे, आशीर्वचन आहे.

देव सगळीकडे आहे. आपले चार हात (स्वस्तिकाचे चार भुज) पसरून, विस्तारून तो साऱ्या दुनियेला कवेत घेतो, आमचं जीवन वेंघेत घेतो, बांधून टाकतो, स्वतःकडे ओढून घेतो, आणि त्या धन्य आलिंगनात आपलं शाश्वत कल्याण निर्माण करून देतो.

स्वस्तिकाच्या नाभिबिंदूत दिशांची अंतिम सार्थकता सिद्ध होते.

# ७ : कथा

मनाला कथेचं आकर्षण आहे.

कथा माहितीची आहे. पुष्कळ वेळा ऐकलेली आहे. तरीही जवळच कथा व्हायची आहे असं कळलं की, मन तिथं जायची नोंद करतंच. कथा नवी की जुनी, भक्तीच्या ढंगाची की ज्ञानाची चमक दाखविणारी, खासगी घरात की सार्वजनिक मैदानात काही असलं तरी तिकडं जाणं मनाला आवडतं, जाऊन बसणं आवडतं. मनाची ही वृत्ती कायमची नि निश्चित आहे.

अन् मन प्रामाणिक आहे.

कथेचं आकर्षण खरं आहे, कल्याणकारी आहे, हे मन जाणतं. विचार न करता ते त्याला समजतं आणि म्हणून जाण्याचा आग्रह धरतं.

कथेत बोध आहे, संदेश आहे, शिक्षण आहे. कथा हा शब्दाचा विधी आहे, वाणीचा संस्कार आहे. वाणी हे रोजच्या व्यवहाराचं साधन आहे, शब्द हेमानवाच्या विचाराचं वाहन आहे. आणि तो शब्द, ती वाणी ईश्वराच्या संदेशाचं वाहन बनावं, दिव्य व्यवहाराचं साधन व्हावं, मानवाची भाषा पवित्र व्हावी, त्याच्या तोंडातील उच्चारांना नवा झंकार यावा.

कथा म्हणजे श्रवणाचा यज्ञ, बसून ऐकायचं. शांतपणे, पुष्कळ वेळपर्यंत, श्रद्धेनं ऐकायचं. पुरतं नाही समजलं तरी ऐकायचं. काही वेळा पुरतं लक्ष नाही राहिलं तरीही ऐकत राहायचं. टवकारलेले कान नि उघडं मन. स्वीकारायचं, येऊ द्यायचं, ग्रहण करायचं.

ऐकण्याचं पुण्य. ऐकण्याची साधना. श्रवणयज्ञ.

※

कानात रोज किती बरं मळ येऊन पडतो ! निंदा नि खोटंनाटं नि कुटाळकी नि शिवीगाळ. घरी, कचेरीत, गल्लीत नि बाजारात. खोट्या गोष्टी ऐकाव्या लागतात, गलिच्छ गोष्टी ऐकाव्या लागतात. कान साबणानं स्वच्छ केले तरी तो मळ काही जात नाही, स्नान केलं तरी ती घाण राहाते. तो मळ धुवून काढण्याकरिता कानांकडून थोडं पुण्यकार्य करवून घ्यायचं आहे, थोडी साधना करवून घ्यायची आहे कानांवर आता चांगले शब्द पडतील, पवित्र

वाणी पडेल, दिव्य ध्वनी पडेल. तासन् तास त्यांवर धर्माच्या गोष्टी पडतील; संयम, प्रेम, भक्ती नि सेवा यांच्या गोष्टी पडतील. आणि त्यांच्या पावन प्रवाहात हा कळिमळ धुवून जाईल, वितळून जाईल.

शृंगाराची गीतं ऐकली होती, आता भक्तीची गीतं ऐकू. परनिंदेच्या कथा ऐकल्या होत्या, आता समर्पणाची वर्णनं ऐकू. अशा रीतीनं वाईट संस्कार जातील नि चांगले येतील, वाईट वृत्ती दवतील आणि चांगल्या वृत्ती उसळून येतील. कथेत प्रायश्चित्ताचं बळ आहे आणि शोधनाची शक्ती आहे. कानांच्या वाटे मनात घाणेरडी गोष्ट शिरली तर ती काही केल्या काढता येत नाही. तिचं स्मरण चिकटून राहातं, सतावतं, काही केल्या जात नाही. खरा उपाय दुसऱ्या युक्तीत आहे. वाईट गोष्ट आली तर चांगल्या गोष्टी आणू. स्मरणात अयोग्य गोष्टी भरल्या होत्या तर आता सुयोग्य गोष्टी भरू. दुःस्मरणं होती ती सुस्मरणांच्या धक्क्यानं दवून जातील, निघून जातील. कानाच्या पापांवर उपाय कानाच्या पुण्यात आहे.

※

आपण वाजवीपेक्षा जास्त बोलतो. बोलण्याची सवयच आहे. बोलायचं पुष्कळ आणि ऐकायचं थोडं. चालतं आहे तोवर बोलत राहायचं अन् गत्यंतर नाही म्हटलं की ऐकायचं. हे आपलं वळण आहे. ती आपली चूक आहे. बोलण्यात चंचलता आहे, ऐकण्यात संयम आहे. आणि कथेत आपल्याला ऐकायचं असतं. या, बसा, ऐका. काही घाई नाही, कसली चिंता नाही. ऐकत रहा, स्वस्थ बसा. घड्याळाकडं पाहू नका. कथा सुरू होण्याचा मुहूर्त पाहा, ती पुरी होण्याचा मुहूर्त यानंतर येईल. कथा चालू द्या, वाहू द्या. देवापुढं आपली घाईगर्दी चालणार नाही, आपला उद्धटपणा शोभणार नाही. त्याला वेळ घ्यायचा तो घेऊ दे, तासन् तास आणि दिवसन् दिवस पुरता वेळ घेऊ दे. आपल्या घाईगर्दीत, चिंता अन् धावपळ यांमध्ये कथेची ही शांती, हे आसन, ही दीर्घता, ही स्थिरता किती गुणकारी वाटते !

कथेला बसा. याचा अर्थ जीवनाचा वेग थोपवून धरा. संसाराचं चक्र थांबवा. काळाची गती बंद करा. म्हण आहे की कथेला बसलात तेवढ्या घटका मानवाच्या आयुष्याच्या गणतीत मोजल्या जात नाहीत आणि तितका काळ

त्याचं आयुष्य लांबविलं जातं. आणि ते सत्य आहे की कथेला बसलो तो सगळा वेळ सात्त्विक, स्थिर, अनंत वाटतो. त्याच्या घटका मोजल्या जात नाहीत. त्याला अंतच नसतो.

कथा काही काळ चालते, पण सगळा दिवस पवित्र बनविते. सप्ताह थोड्या दिवसांचा असतो, पण सगळ्या वर्षावर त्याचा प्रभाव राहातो. तो थोडा काळ सबंध जन्माचं प्रतीक आहे. कथेमध्ये देवाला वेळ द्यायचा, व्यवसायी माणसाचा बहुमोल वेळ त्याला अर्पण व्हायचा. वेळाचा यज्ञ. तासांचा नैवेद्य. आणि या यज्ञाचा प्रसाद म्हणून जीवनाच्या समग्र काळावर देवाचा आशीर्वाद उतरायचा. आधुनिक मनुष्य वेळाचा लोभी असतो. पैशापेक्षा वेळेचा तो जास्त कंजूषपणा करतो. पैसे देईल, पण वेळ नाही देणार. त्याचं वेळापत्रक आहे, त्याच्या भेटीचा वेळ आहे, त्याच्या कचेरीचे तास आहेत, अन् त्याखेरीज तो कुणालाही भेटणार नाही, कुणाचं काम करणार नाही. तो वेळ देईल तो मोजून देईल. म्हणजे इतक्या वाजता या, इतका वेळ बसा नि इतक्या वेळात संपवा. वेळ मोलाचा ना ! वाचविला पाहिजे. या जाणिवेत आधुनिक माणूस जगतो, वागतो.

पण कथेत त्याचा हा आग्रह जावा, तो लोभ सुटून जावा. कथेला बसायचं ते वेळाची मर्यादा न बांधता बसायचं, मिनिटं न् तास न मोजता बसायचं. वेळ देवाचा आहे. त्याला जेवढा घ्यायचा असेल तेवढा घेऊ द्या. वेळापत्रक बाजूला ठेवा. धंद्याचं घड्याळ बंद करा. कथा लांब आहे, सावकाश वाचायची आहे, स्वस्थपणानं ऐकायची आहे. एवढ्याकरिताच कथा ही आधुनिक जीवनाच्या धांदल-गडबडीवर, धावपळीवर औषध आहे.

※

कथेतली गोष्ट माहीतच आहे. तीच ती असते. तेच ते प्रसंग आणि तेच श्लोक आणि तोच रस. इतकंच नव्हे तर त्यातले दृष्टांत अन् उदाहरणं सुद्धा आपल्याला माहीत असतात. पुष्कळशी तीच तीच येतात, पुनः पुन्हा येतात. पण काही हरकत नाही. आंब्याचा स्वाद सुद्धा आपण जाणत नाही का ? तरी पुनः पुन्हा तो खातो, अन् स्वाद कमी नाही होत, वाढतोच. कथा अगोदरच माहीत असल्यानं कथेचा रस कमी होत नाही, खरं पाहाता वाढतो. पहिल्यांदा

ऐकतो तेव्हा नाविन्य वाटतं, कुतूहल जागं होतं, त्यामुळं भक्तीला वाव थोडा असतो. नवं जाणायला मिळतं म्हणून मन विशेष प्रवृत्त होतं, आणि हृदयात कमी उतरतं. पण एक वेळ ऐकल्यानंतर, दहा वेळा ऐकल्यानंतर जाणायचं ते सगळं जाणून घेता येतं, कुतूहल पुरतं शमतं. मन शांत होतं– आणि हृदयात भक्तीचे निर्झर फुटू लागतात.

त्यातही कथाकार खरा जर भक्त असला, ज्ञानाच्या शिक्षणाबरोबर त्याला साधनेचा अधिकार असला जर तो केवळ पुस्तकातून न सांगता अनुभवातून आणि हृदयाच्या गाभ्यातून बोलत असला, तर खरोखर भक्तीचं वातावरण जमू लागतं आणि अंतःकरणाला वेगळाच आनंद होतो. कथा हा भक्तीचा मेळावा आहे, हृदयाची मैफल आहे. ज्ञान काय कुठंही मिळविता येईल पुस्तकं आहेत, अभ्यासक्रम आहेत. पण भक्ती अभ्यासात नाही, ती भक्ताच्या हृदयात आहे. म्हणून असे भक्त भेटले, कथा सांगू लागले, देवाविषयीचं आपलं प्रेम, आपली निष्ठा, भक्ती नि समर्पण विनासंकोच आणि विना-अभिमान सरळसरळ आणि निखालसपणे दर्शवू लागले की अंतःकरणातून प्रतिसाद उमटू लागतो. तसाच भाव उठू लागतो, खोल भक्ती जागी होते, आणि जीवन धन्य धन्य होऊन जातं !

कथेत ही शक्ती आहे. एकाला ती स्पर्शून जाते, दुसऱ्याला स्पर्शून जाते, सर्वांना स्पर्शून जाते. एकत्र बसलो आहो, एकत्र त्या मंगल प्रभावाखाली आलो आहो. शेजारी बसलेल्यांना भक्तिरसात थबथबून गेलेले पाहून मलाही प्रेरणा होईल. सर्वांचं ध्यान बघून माझ्यातही एकाग्रता येईल.

माणसानं घराच्या एका कोपऱ्यात एकटं बसून पूजा करणं हे चांगलं आहे. तो शुद्ध विधी आहे, गुप्त प्रार्थना आहे. पण माणसानं बाहेर येऊन, उघड्यावर अन् जाहीरपणे, सर्वांच्या मध्ये नि सर्वांच्या देखत कथेला बसणं, भक्तीचा उमेदवार बनणं, धर्माचं गिऱ्हाईक नि सभासद बनणं, हेही आवश्यक आहे. धर्म हा हृदयाचा विषय आहे, तसा तो समाजाचाही आहे. व्यक्तिगत आहे तसा सार्वजनिकही आहे. व्यक्तीच्या साधनेबरोबर समूहाची साधना हवी. एकट्यानं पूजा करायची त्याबरोबर जनसमुदायाची कथा हवी. कथेला बसण्यात धर्माची कबुली आहे, श्रद्धेचं विज्ञापन आहे, भक्तीची हिंमत आहे.

*

कथा संपवून उठलो तो अंत:करणात शुभ भावना आणि प्रसन्न भाव घेऊन. नवी दृष्टी आली, नवा उत्साह आला. आता कथेचा परिणाम जीवनावर झाला पाहिजे. भगवंताच्या गोष्टी ऐकल्या त्यांचा अंमल आता झाला पाहिजे. धर्माचा संदेश मिळाला तो आता आचरणात उतरला पाहिजे. "कथा छान होती" असं सांगण्यात कथेची कदर नाही, तर कथा ऐकून जीवनात खरोखर बदल घडला यात कथेची खरी कदर आणि खरी प्रशंसा आहे.

कथा आपणाला एकत्र करते, धर्माच्या गोष्टी ऐकविते, भक्तीची दीक्षा देते, नीतीचा बोध पोचविते.

कथेचा प्रसंग हा खरोखरच कृपेचा प्रसंग आहे.

# ८ : जप

हाती माळ आहे. मणी बोटातून सरकत जात आहेत. ओठांवर भगवंताचं नाम आहे. श्वास सावकाश, भक्तीनं, लयपूर्वक घेतला जात आहे; आणि प्राणासंगती प्रार्थना विणली जात आहे. नामाची उपासना. जपाची साधना.

ही प्रक्रिया सोपी वाटते. न शिकलेली आई ती करू शकते. छोटा मुलगा करू शकतो. पण तिचं मर्म खोल आहे. ते महापुण्य आहे. जर श्रद्धेनं न् चिकाटीनं ती केली तर या जपयज्ञात माणसाला आध्यात्मिक पंथानं पुढं नेण्याचं मोठं सामर्थ्य आहे.

जपामध्ये भगवंताचं नाम आहे आणि भगवंताच्या नामात शक्ती आहे. तो मंत्र आहे, वेद आहे, ओंकार आहे. माणसाचं नाव माहीत झालं म्हणजे आपण त्याला बोलावू शकतो. प्रियतमेचं नाव समजलं म्हणजे त्याचा वरचेवर जप करून आपण धन्य होतो. एखाद्याला बोलाविण्याकरिता, जवळ आणण्याकरिता, मदत मिळविण्याकरिता आणि प्रेम करण्याकरिता पहिलं साधन नाम हेच असतं. म्हणून भक्तीचं न् योगाचं, ध्यानाचं न् शुद्धीचं अगत्याचं पाऊल जप हे असतं. देवाचं स्मरण करायला, त्याला बोलवायला किंवा खरं म्हणायचं तर आपणा स्वतःला देवाचं स्मरण करून द्यायला आणि स्वतःला त्याच्याजवळ घेऊन जायला नामस्मरण आणि नामोच्चारण हे अमोघ साधन आहे. तो केवळ बाह्य विधी नाही, ओठांची बडबड नाही किंवा हवेचा निव्वळ तरंग नाही. नाम अंतःकरणात आहे म्हणूनच जिभेवर येतं आणि जिभेवर येतं म्हणून हृदयात अधिक खोल उतरतं. बाहेरची क्रिया ही आतल्या भावाचा आविर्भाव आहे, आणि अंतरातील भाव हा बाहेरच्या क्रियेनं सुदृढ बनतो. नाम उच्चारण्यात धन्यता आहे, कारण त्या नामाचा धनी हृदयाचं सर्वस्व आहे.

जपात मनाचा न् देहाचा सुमेळ आहे म्हणूनच त्याचं महत्त्व आहे. विचार आहे नि क्रिया आहे, भावना आहे नि मुद्रा आहे, श्रद्धा आहे नि शब्द आहे. मण्यांची माळ आहे नि भक्तीचा उमाळा आहे. जपात बोटं बोलतात, हात बोलतो, ओठ बोलतात अन् श्वास बोलतो. सगळा देह बोलतो आणि

सगळा आत्मा बोलतो. ही प्रार्थना आहे समग्र मानवाची, साधना आहे हृदयाची न् देहाची. त्यात मानवाच्या सर्व शक्ती एकत्र होतात, सगळी अंगं भाग घेतात. आणि ते सुटे सुटे मणी ध्यानाच्या सूक्ष्म दोऱ्यानं बांधले जातात, एकत्र राहातात. एक अखंड, अविरत माला बनते. दोरा तुटला की मणी विखरून जातात, आणि ध्यान सुटलं की जप विसरून जातो. मणी तुळशीचे असोत की रुद्राक्षाचे असोत, चंदनाचे असोत की काचेचे असोत, त्यांना एकत्र राखणारा, दीक्षा देणारा, प्रार्थनारूप बनविणारा तो दोरा आहे, ते ध्यान आहे, ती भक्ती आहे.

※

आणि माळ तर अंतरहित आहे. एकशेआठांची संख्या, पण एक वेढा पुरा झाला की दुसरा सुरू. आणि तोही त्या दोऱ्याच्या प्रतापानं. तो बांधलेला, सांधलेला आहे म्हणून त्याचा अंतच कधी नाही. गोल गती आहे, शाश्वत चक्र आहे. माळेचे फिरून फिरून नवे अवतार होतात. आपल्या बोटानं ती पुनर्जन्म पावते. एक माळ दुसरी करण्याची आकांक्षा उत्पन्न करते, एक संपली की दुसरी सुरू करण्याचा वायदा करून जाते. माळ सतत तयार, बोटावर चालायला उत्सुक. आणि मग त्याच्या कामासाठी तिला ठेवून देऊन दुसरं काही करावं लागेल, हातात दुसरं काही धरावं लागेल तेव्हा सुद्धा कोपऱ्यांत पडलेली ती माळ बोलत राहाते, साक्ष देत राहाते की आम्ही त्या बोटांच्या स्पर्शानं घासलेले आहोत. देवाच्या नामोच्चारानं घडलेले आहोत, म्हणून आमचा तोच अवतार आहे, तोच अर्थ आहे, तीच भाषा आहे, ती बोटं आता आम्हाला फिरवू शकत नसतील तर त्याचं स्मरण आम्ही करीत राहू, ते ओठ आता ते पवित्र नाम उच्चारू शकत नसतील तर आम्ही त्याचा पडसाद उमटवीत राहू. जपाच्या अभ्यासानं घासलेली माळ मूर्तिमंत प्रार्थना, नित्य संकेत, भक्तीची साक्षीदार आहे. तिचा धनी बोलत नसेल तेव्हा ती बोलते, तिचा धनी झोपी गेला असेल किंवा काम करीत असेल तेव्हा ती त्याच्या हृदयाचे भाव पकडून त्याच्या प्रेमाचा संदेश देवाच्या चरणांपर्यंत नेऊन पोचविते.

एक श्रद्धाळू भक्त माळ पुरती करून कचेरीला जात तेव्हा माळेला ॐच्या आकारात मांडून जात. भावना अशी की माझं मन आता दुसऱ्या कामात गुंतलं

असेल आणि माझा हात माळ नव्हे पेन घेऊन काही लिहिण्यात प्रवृत्त झाला असेल त्या काळात माझी ही माळ घरी राहून, देवाच्या मूर्तीपाशी राहून, ॐच्या आकारात राहून माझा हा जपयज्ञ चालू ठेवील; मी तिच्या मण्यामण्यात रोजच्या उपासनेनं जी भक्ती भरलेली आहे ती बोलती होईल, बोलत राहील. सुंदर भावना होती आणि सार्थक श्रद्धा होती. आणि माळ गळयात कंठीप्रमाणं घालून फिरण्यात सुद्धा हीच भावना आहे की ! बोटी नाही तर कंठी, शब्दोच्चारानं नाही तर मौनानं, पण ते नाम, ते स्मरण, तो जप सतत हवा, आणि त्याचं प्रतीक गळयात लटकाविलेली ही माळ आहे. ही स्वयंवराची माळ आहे, दिग्विजयाची माळ आहे, शरणागतीची माळ आहे.

※

जपाचा हा विशेष लाभ असतो की थोडयाशा अभ्यासानं नि प्रयत्नानं तो जवळजवळ सबंध दिवसभर चालू ठेवता येतो. संत आणि साधक तसं करतात अशी साक्ष आहे. चालत असू तेव्हा पावलांच्या गतीबरोबर नामाचा जप चालावा, बसमध्ये बसलो असलो तर एंजिनाच्या कर्णकर्कश आवाजाबरोबर मंत्रोच्चार जोडला जावा, काम करीत असलो तर मधून मधून आणि वेळी कामा-बरोबर सुद्धा ओठांवर नाम यावं, बोललं जावं, पूजलं जावं. हात दुसरं काम करीत आहेत, आणि ओठ भगवंताचं नाम उच्चारीत आहेत. हे काय आपण पाहिलेलं नाही ? ओठाचा अभ्यास, श्वासाचा सहकार आणि हृदयाची जागृती असली म्हणजे मग यज्ञ सुरू व्हायचाच ! जपात लय आहे आणि जीवनातही लय असतो. ते दोघे एकमेकांचा ताल जोडून चालतील तेव्हा जीवनाच्या छंदात भक्तीचं संगीत निर्माण होईल. श्वास चालत आहे, नाडी बोलत आहे,पाय चालत आहेत, घंटा वाजत आहे आणि श्वासाबरोबर, त्या हृदयाच्या ठोक्याबरोबर, पावलांच्या आवाजाबरोबर आणि घंटेच्या ठोक्याशी लयपूर्वक, श्रद्धापूर्वक ते स्मरण, तो उच्चार, ते पवित्र नाम जोडलं जात आहे. प्राणाच्या प्रक्रियेबरोबर प्राणाची उपासना मिसळून जाते. देहाला टिकविण्यासाठी घातलेल्या श्वासात देवाचं नाम गुंडाळून येत आहे. प्राण आणि प्राणाचा स्वामी, हृदय आणि हृदयाचा स्वामी यांचं हे मंगलमीलन आहे.

इतर क्रिया चालू असताना जपाचा कार्यक्रम चालू शकतो हीच त्याची महत्ता आहे – आणि त्याचा धोकाही आहे. महत्ता आहे कारण इतर क्रियांच्या

सोबत तो चालू शकतो म्हणजे सबंध दिवस नि सगळ्या जीवनभर चालू शकतो. आणि धोका आहे कारण त्या क्रिया शुभ नसतील, योग्य नसतील, नव्हे नीतियुक्त नसतील तेव्हा सुद्धा तो जप चालू शकतो आणि त्याचा विपरीत उपयोग होऊ शकतो. ओठांवर देवाचं नाव असेल आणि डोळ्यात कुदृष्टी असेल किंवा मनात वैरभाव असेल, हे शक्य आहे आणि ती विकृतीच आहे. तो अनर्थ टाळण्याकरिता जपात देवाचं नाव घ्यायचं तेव्हा ते ध्यानानं, भानानं, पूज्य भावानं घेणं योग्य, ज्या योगे त्या पुण्यनामाच्या उच्चाराबरोबर विचार नि भाव, कार्य नि संकल्प सुद्धा शुभ नि पवित्र राहातील.

जपाची साधना सोपी आहे यातही त्याची महत्ता आहे तसा त्याचा धोकाही आहे. महत्ता ही की सोपी असल्यामुळं कोणीही माणूस ती सुरू करू शकेल, सिद्ध करू शकेल आणि या सुलभ उपायानं मोठं पुण्य मिळवू शकेल. परंतु धोकाही आहे, कारण आध्यात्मिक प्रगतीचं हे शक्तिशाली साधन इतकं साधं सोपं असल्यामुळं मनुष्याला असंही वाटू शकेल की ठीक, थोड्या किंमतीत महाग सौदा पटविण्याची युक्ती हाती लागली ! आता सिद्ध होणं ही आपल्या हातची गोष्ट आहे. माळ घेऊन बसू. रोज इतकी माळ, इतका जप. मी वेळ ठरवायचा तेवढाच अवकाश. मग मी बोटं चालविली की माळ फिरेल, ओठ हालविले की नामोच्चारण होईल आणि त्याच्या पाठोपाठ ध्यान येईल, पुण्य येईल, सिद्धी येईल. संपलं. माझं काम आणि माझा प्रयत्न. माझा निर्णय आणि माझी सफलता. जपाचा जर इतका महिमा आहे आणि इतका सोपेपणा आहे तर त्याचा लाभ घेऊन मी माझ्या बळावरच महान सिद्धी प्राप्त करून घेईन.

असं रूप देण्यात फार मोठी चूक आहे. आणि पुष्कळ वेळा जपाचा प्रयोग निष्फळ का होतो याचा खुलासाही त्यात आहे. पुष्कळ जप केला पण परिणाम काही झाला नाही, असंख्य वेळा देवाचं नाव घेतलं पण देव आला नाही. मग जपाचं फळ कसलं नि महिमा कसला ? इतक्या वेळा माळ फिरविली, इतकी वर्षं प्रयत्न सुरू ठेवला, पण जीवन सुधारलं नाही, मनात स्थिरता आली नाही. मग या माळेला अर्थ काय नि परिणाम काय ? होय, इतकं तप केलं खरं. पण मनाचा हेतू थोडा विकृत होता, म्हणून अपेक्षित परिणाम निष्पन्न झाला नाही. मनात होतं की आता मी करीन, मी दाखवीन. माळ धरायला मला कोण मना करणार ? नाम उच्चारायला मला कोण अटकाव करणार ?

मग इतक्या माळा म्हणजे इतकं पुण्य, इतका जप म्हणजे इतका अधिकार, आणि त्या अधिकारानं सिद्धी, वरदान, मुक्ती मिळणार. माझी साधना असणार, माझी सिद्धी असणार–होय, पण माझा अभिमान नि माझा अहंकार नि माझा मूर्खपणा सुद्धा असणार! माझं माझं करून धर्माची साधना कशी करता येईल? केवळ स्वत:चं बळ वापरून परमात्म्याची प्राप्ती कशी होईल? अहं विसरायला लावण्याचं कार्य अहंला जोपासून कसं होईल? हा धोका, आणि या धोक्यात सापडलो की सारा प्रयोग निष्फळ होणार.

म्हणून माळ किती फिरली याची मोजदाद करण्याची आवश्यकता नाही, किती जप केला त्याचा हिशोबही आवश्यक नाही. हे गणित धर्मात शोभायचं नाही. हा व्यापार अध्यात्मात चालायचा नाही. ही काही एखादी स्पर्धा नव्हे की तिचा विक्रम टिपावा, एखादी परीक्षा नव्हे की मार्कांचा आकडा जाहीर व्हावा. हा प्रेमाचा विषय आहे, श्रद्धेचा–भगवंताच्या कृपेचा विषय आहे. इतका जप केला म्हणजे इतक्या वरदानांचे अधिकारी बनला असं नाही. अधिकाराचा इथं प्रश्न नाही. विषय शरणागतीचा आहे. देवाचं नाम उच्चारतो कारण देवाविषयी प्रेम आहे, आणि ते प्रेम तीव्र आहे, गंभीर आहे, चिरंतन आहे, म्हणून ते पूज्य नाम सतत बोलण्याचा प्रयत्न आपण करीत असतो. जपाचा पाया भक्ती आहे, त्याचा आधार श्रद्धेवर आहे, आणि त्याचा परिणाम भगवंताच्या कृपेनंच फलित व्हायचा आहे.

जपासाठी खरी तयारी नि खरी पात्रता नम्रतेची, आदराची, पूज्य-भावनेची आहे. आपण देवाचं नाव घेणार आहोत. ते काय असंच घ्यायचं? मलिन ओठांवर घ्यायचं? अशुद्ध श्वासानं उच्चारायचं? जपात देवाचं नाव घेण्यासाठी प्रथम त्याची आज्ञा मागू या, त्याची परवानगी घेऊ या. देवाच्या अनुग्रहावाचून जपयज्ञाला बसता येणार नाही. पण देवाचा अनुग्रह कायमचा आहे, आज्ञा लगेच मिळते. ती आज्ञा शिरी धरून आणि तो भाव हृदयात उतरवू देऊन आता शांतीनं, भक्तीनं, ध्यानपूर्वक जपशाळेत बसू. हाती माळ घेऊ. बोटांना वेग देऊ. श्वासासंगती लयबद्ध, सतत, रात्रंदिवस देवाचं नाव घेत जाऊ. आणि त्याच्या कृपेनंच त्याची शुभ फळं अनुभवू.

▭

# ९ : प्रार्थनेचा सोबती

प्रार्थना कोण करतं ?

प्रार्थना कोण कोण करतात, कोण-कोणते लोक करतात, केव्हा करतात— हा या प्रश्नाचा आशय नाही. आशय हा आहे की मी हा प्रार्थनेला बसलो आहे, प्रार्थना करीत आहे तर माझ्या-मध्ये कोण प्रार्थना करीत आहे ? माझं मन की माझं हृदय, माझी बुद्धी की माझा आत्मा ? की सगळे एकत्र अथवा दुसरं कोणी ? प्रार्थना कोणाची आहे ? माझी आहे, पण माझ्यात कुणाची, कशाची ? कोणाची प्रक्रिया आहे ? कोणाच्या सहकारानं होते ?

प्रार्थना मनाची नि हृदयाची आहे ही गोष्ट खरी मुख्य गोष्ट म्हणजे मनाचं लक्ष पाहिजे, अंत:करणाची तन्मयता पाहिजे. त्यावाचून प्रार्थना होणार नाही, आणि होईल तर तिला प्रार्थनाच म्हणता येणार नाही. पण प्रार्थना देहाची सुद्धा आहे हा मुद्दा आहे. प्रार्थनेला आता हा माझा देह बसला आहे. त्यानं आसन घातलं आहे. त्याचा श्वास आहे. प्रार्थनेत त्याची मदतही आहे आणि त्याची अडचणही आहे. आणि ही साधी गोष्ट विसरल्यामुळं प्रार्थनेत कित्येक वेळा अपेक्षित सफलता मिळत नाही.

देहाची सुद्धा साधना आहे. तो स्वस्थ नि शांत, संयमी नि हलका राहील तरच प्रार्थना जमेल. स्थूल आणि विलासी देह घेऊन प्रार्थनेला बसणं व्यर्थच आहे.

स्नान करूनच पूजेला बसावं हा आग्रह सुद्धा हीच गोष्ट सुचवितो. स्नानात ताजेपणा आहे, पवित्रता आहे. देहाची शुद्धी आत्म्याच्या शुद्धीला प्रेरक होते. अवयवांची स्फूर्ती भावनेला वेग देते. स्नान ही प्रार्थनेची तयारी आहे, अंगण आहे. आणि म्हणून पुढच्या प्रार्थनेच्या पूर्वसूचनेनं केलेल्या स्नानात त्या सात्त्विक संतोषाचा भाव असतो. स्नानाच्या विधीनं शरीराला प्रार्थनेकरिता पात्र बनविण्यात येतं, म्हणून स्नान हा सुद्धा पवित्र विधी आहे.

प्रार्थनेकरिता आसन स्थिर व तपस्वी पाहिजे. आरामखुर्चीत पसरून बसून प्रार्थना करणं योग्य नाही. वातावरण शांत नि शुद्ध पाहिजे. धुपाचं ध्यान आणि मौनाची संगत. एकाग्रता नि सावधानता.

पण आणखी एका दुसऱ्या रीतीनं – आणि ते मुख्य रीतीनं – प्रार्थना करण्याकरिता देहाकडून काम घ्यायचं असतं – आपण घेतो. ती रीत म्हणजे उपवास.

※

उपवास हा साधनेमध्ये देहाचा अगदी वेगळा हिस्सा आहे. प्रार्थनेत हा देहाचा सहकार आहे, नव्हे देहाची ती प्रार्थनाच आहे. मनाचा निश्चय होता की प्रार्थना करायची, पुरती करायची, खरीखुरी करायची. पण मन एकटं प्रार्थना करणार कसं ? ते फक्त तर्क करू शकेल, कल्पनांची घोडी दामटू शकेल, ते फक्त विनंती करू शकेल; शब्द आहेत, विचार आहेत. म्हणजे शेवटी हवा आहे, शून्य आहे. मनाला याहून काही जास्त करायचं होतं, काही ठोस आणि वास्तविक करायचं होतं म्हणून त्यानं देहाचा सहकार घेतला. देहाकडून साधना करवून घेतली. पाहाता येईल, मापता येईल अशी साधना करून घेतली. समांतर साधना. स्वतःच्या विनंतीला पुष्टी म्हणून स्वतःच्या देहाचा टेकू. मनानं विनंती करायची नि देहानं उपवास करायचा. मनानं सांगायचं नि पोटानं रिकामं राहायचं. मन ध्यानात नि देह उपवासात. राग नि ताल. शब्द नि संगीत. प्रत्येकजण आपापल्या रीतीनं पण दोन्ही जोडीनं, दोन्ही समांतर. उद्देश एकच आहे, एकाच क्रियेच्या दोन बाजू आहेत.

उपवास म्हणजे अध्यात्माच्या साधनेत देहाला विश्वासात घेणं. त्याला बाजूला नाही टाकायचा, त्याचा बहिष्कार नाही करायचा. त्यालाही यायचं आहे, तप करायचं आहे, पुण्य मिळवायचं आहे आणि त्याच्या साहाय्यानं साधनेला वेग येणार आहे. देहाला विश्वासात घेतला तर तो आध्यात्मिक प्रगतीचं साधन आणि प्रार्थनेचा इमानदार सोबती होऊन राहील.

कदाचित आज मन प्रार्थना बरोबर करीत नव्हतं. ध्यान नव्हतं, एकाग्रता नव्हती. हरकत नाही. मन प्रार्थना करू शकत नसेल तर पोट करील – आपल्या पद्धतीनं, आपल्या उपवासानं, स्वतः रिकामं राहूनच ते मनाची शून्यता दाखवील. त्याचा उपवास चालू राहील तेवढे तास ते मनाची प्रार्थना आपल्या अंगावर घेईल, मन रिकामं असेल तेवढा वेळ ते रिकामं राहील आणि भुकेच्या भाषेनं भगवंताची कृपा याचीत राहील.

सदाचरणात गफलत झाली. होतेच. न बोलावं असं काही बोललं गेलं, न करावं असं केलं गेलं, कुणाला तरी दु:ख दिलं, कोणाची तरी निंदा केली, वचन दिलं होतं ते पाळलं नाही, निर्धार केला होता तो आचरला नाही. अशी एक चूक झाली. मग त्याची जाणीव झाली, खेद वाटला, पस्तावा झाला. मनातल्या मनात देवाची क्षमा सुद्धा मागितली. पण ती चूक जरा मोठी होती. तिचा भार अजून मनावर होता. म्हणून प्रायश्चित्तरूपानं एक–दोन उपवास केले. जाहिरात करण्याकरिता नाही, लोकांची प्रशंसा मिळविण्याकरिता नाही, तर खाजगीत, एकांतात केले. शांतीनं, नम्रतेनं. देहाच्या द्वेषानं नव्हे, देहाच्या सहकारानंच केले. "प्रभो, मला क्षमा कर" ही प्रार्थना ओठ करीत होते, तीच आता देहानं उचलली. खेद आता शब्दातच नव्हे तर कार्यात दर्शविला गेला, जिभेच्या बोलण्यातच नव्हे तर पोटाच्या उपवासात व्यक्त झाला. त्यात चुकीची जाणीवही अधिक राहिली, ती सुधारण्याची ताकीद अधिक मिळाली, ती फिरून न करण्याचा निश्चय अधिक दृढ झाला. आणि काही नाही तरी देवापुढं अभिनयानं नि कृतीनं ही ठोस नि वास्तविक नि प्रयोगयुक्त प्रार्थना ठेवली की, "केलेल्या चुकीबद्दल अंत:करणात खरोखर पश्चात्ताप आहे, ती झाली नसती तर किती बरं झालं असतं असा भाव आहे; आणि ती फिरून न करण्याचा हा निश्चय आहे, प्रतिज्ञा आहे."

प्रभूकडून कृपा हवी होती, साहाय्य हवं होतं. अडचणीत आश्वासन किंवा गोंधळलेल्या अवस्थेत मार्गदर्शन, परीक्षेत यश किंवा आजारातून मुक्ती. स्वत:-करिता किंवा प्रिय स्वजनाकरिता का होईना, ही कृपा हवी होती, अवश्य हवी होती. किंवा स्वत:च्या साधनेत साहाय्य हवं होतं, प्रार्थनेत स्थिरता हवी होती, पूजेत भक्ती हवी होती, अंत:करणात त्याग हवा होता, आत्म्यात बळ हवं होतं. या प्रकारचं काही आध्यात्मिक वरदान हवं होतं, मनापासूनच्या अन् योग्य आग्रहानं हवं होतं म्हणून ही याचना देवापुढं ठेवली. श्रद्धेनं नि नम्रतेनं गरज जाणवून दिली, विनंती केली : "हे प्रभो, मार्ग दाखव, उचलून घे; दर्शन दे." मग वाटलं, जरा जोर केला पाहिजे. ही अंत:करणाची गरज खोल आहे, खरी आहे हे दाखविण्यासाठी जरा बाह्य आग्रह सुद्धा करावा. म्हणून प्रार्थनेच्या बरोबर उपवास केले; विनंतीसोबत तप जोडलं, भावनेनं न् दीनतेनं हे केलं, कसलाही त्रागा नाही की वैराग्य नाही, फक्त अंत:करणाचा आग्रह दाखवावा,

अंतरातील अपेक्षा उघड करावी म्हणून उपवास केले. ती मूक प्रार्थना होती. आर्द्र मुद्रा होती. कृपा किती आवश्यक आहे, वरदान किती मोलाचं वाटतं त्याची ही घोषणा होती. मनानं विनंती केली आणि देहानं सुद्धा केली. हा विचार होता, म्हणजेच हाती असलेल्या सर्व रीतींनी प्रार्थना झाली होती, शक्य तेवढे सगळे उपाय केले होते, आणि त्याचा अंत:करणाला संतोष होता. संतोषाबरोबरच श्रद्धा ठेवली की इतक्या आग्रहानं केलेली विनंती भगवान् मान्य केल्यावाचून राहाणारच नाही.

मुख्य याचना आहे देवाच्या दर्शनाची. साधनेचा पाया हृदयाची तीव्र तळमळ हा आहे हे पूर्वीच सांगितलं होतं. तळमळ म्हणजे भूक. ही भूक आहे हृदयाचीच, पण तिला साकार करण्यासाठी पोटाची भूक येईल. ती त्याचा संकेत आहे, साक्षी आहे. ती स्थूल पण मूर्तिमंत तळमळ आहे. भुकेलेलं पोट देवाला पुकारत राहील. भुकेनं हृदय देवाकरिता तळमळत राहील. दोन्हीची साधना फळाला येईल.

नि मग आभारही मानायचे होते. देवाचे आभार. केलेल्या उपकाराकरिता, मिळालेल्या कृपेकरिता. कटकटीच्या प्रसंगी आधार मिळाला, कसोटीत उलटा लाभच झाला. म्हणून पाड मानायचे होते, कृतज्ञ भाव दर्शवायचा होता. आणि दर्शविलाही. शब्दांत, मनात. पण शब्दांनी आभार मानून काय संतोष होणार आहे? 'थँक यू'सारखा स्वस्त उच्चार केल्यानं काय मनाचं समाधान होणार आहे? नाहीच होणार. म्हणून अंत:करणानं शरीराला हुकूम केला. आणि आनंदानं अन् राजीखुषीनं शरीरानं आपल्या पद्धतीनं, एखादा उपवास करून कृतज्ञता दर्शविली. ती त्याची भाषा होती, त्याचं आभार प्रदर्शन होतं.

※

अशा रीतीनं देह धर्माच्या कार्यात जोडला जातो. विनंती आणि आभार, निश्चिय आणि प्रायश्चित्त या दोन्हीत तो भाग घेतो. चुकी केल्याची जबाबदारी तो आपल्या अंगावर घेतो, प्रगतीकरिता करायचा प्रयत्न स्वत:चा मानतो. आणि त्याचं वजन पडतं, त्याचा परिणाम दिसून येतो. आता मन एकटंच नाही, अधांतरी नाही. आता मनाच्या विनंतीबरोबर देहाचं प्रमाणपत्र जाईल, हृदयाच्या संकल्पासोबत देहाची शिफारस जाईल. आता प्रार्थना प्रमाणभूत

होईल, पूर्ण न् खोल अर्थानं प्रमाणभूत होईल. आता मानव सबंधच्या सबंध धर्माच्या कामी जोडला जाईल. देहाचा उपकार आहे, देहाचा सहकार आहे.

प्रार्थनेचा सोबती. साधनेचं निमित्त. धर्माचं उपकरण.

प्रार्थना कोण करतं ? मन करतं, हृदय करतं पण त्यांच्याबरोबर ओठही करतात, जीभही करते, कंठही करतो नि श्वास सुद्धा करतो, हात करतात नि पायही करतात, आणि . . . आणि पोट ते सुद्धा करतं. मिळून करण्याचं काम आहे. सामूहिक साधना आहे. प्रत्येकाचा हिस्सा आहे आणि सर्वांचा लाभ आहे.

देहाचा मान ठेवून, त्याचं महत्त्व मानून त्याला प्रार्थना करताना बरोबर आणू या, बरोबर ठेवू या, त्याला विश्वासात घेऊ या आणि प्रसंगानुरूप त्याच्याकडून योग्य साधना करवून घेऊ या, म्हणजे मग प्रार्थना सोपी होईल, सफल होईल.

# १० : मौन

शब्दाहून मौन बलवान आहे. मनात जे काही होतं ते शब्दाद्वारा बाहेर पडलं की मन रिकामं. हाक मारली, गप्पागोष्टी केल्या, भाषण केलं—त्यानं जो काही परिणाम झाला तो झाला, पण मनाचं ध्यान तुटलं, अंतराची शांती बिघडली, आत्म्याचं धन लुटलं गेलं. वाफ निघून गेली की यंत्राचा जोर संपला.

बोलणं सोपं आहे, सुलभ आहे. मनात येताच बोललो; वृत्ती होताच सांगून टाकलं. पण त्यात धोका आहे, उथळपणा आहे, चंचलपणा आहे. उलट, ती वृत्ती अडवून धरण्यात संयम आहे, प्रौढता आहे आणि पुण्य आहे. बीज महिनोन् महिने शांतपणे धरतीच्या पोटांत राहिलं तरच ऋतू येताच तें फुटेल, अंकुरेल आणि त्याला फळ येईल. विचार माणसाच्या मनात रात्रंदिवस घोळत राहिला तरच बाहेर पडताच त्याचा प्रभाव पडेल. शब्द मौनाच्या मुशीत तावला तरच तो सोनं बनून बाहेर पडेल.

सात वर्षपर्यंत मौन व्रत पाळल्यानंतर मुनी बोलणार होते त्या वेळी पुष्कळ लोक त्यांचे पहिले शब्द ऐकायला गोळा झाले होते. जणू बोलण्याच्या दीर्घकाळच्या उपवासाचं ते पारणंच करणार होते! शेवटी मुनिश्री पुण्य मुहूर्तावर बोलले. त्यांचे पहिले शब्द होते: 'ॐ शांतिः', आणि त्या शब्दांच्या उच्चाराबरोबरच ऐकणाऱ्या सर्वांना खोल शांतीचा अनुभव मिळाला, ओंकाराच्या चमत्काराचा स्पर्श झाला. 'ॐ शांतिः' तर रोज आपण सगळेच म्हणतो, पण रोज उगीच बोललेले शब्द वेगळे आणि दीर्घ साधनेनंतर म्हटलेले मंत्र वेगळे. मुनिश्रींच्या उच्चारात सात वर्षांच्या तपश्चर्येचं बळ होतं म्हणून त्याचा हा परिणाम झाला. मौन हे बँकेसारखं आहे; त्यात शब्दांचं भांडवल आणीबाणीच्या वेळी सव्याज परत मिळतं.

※

मौनात निष्क्रियता नाही, पूर्णता आहे, मौनात निवृत्ती नाही, जागृती आहे. मौन हा केवळ चूप राहण्याचा प्रयोग नाही. दगड सुद्धा बोलत नाही, पण ती त्याची जड प्रकृती आहे, त्याची ती सिद्धी नव्हे. शून्यतेच्या मौनात आणि

पूर्णतेच्या मौनात फरक आहे. काही बोलायचं नाही म्हणून बोलत नाही हे शून्य. पण पुष्कळ बोलायचं आहे, इतकं बोलायचं आहे की ते शब्दात येऊ शकणार नाही म्हणून मौन घेतलं आहे हे पूर्ण. भावना जितकी प्रबळ असेल तितके शब्द कमी कामी येतात. मित्राला सामान्य दु:ख असेल, त्याचा मुलगा नापास झाला असेल किंवा त्याच्या घरी कोणी आजारी पडलं असेल तर त्याला भेटून आश्वासनाचे थोडे शब्द सहजपणे आपण बोलतो. पण त्या मित्रावर दु:खाचा डोंगर कोसळला असेल, घरचं कोणी जिव्हाळ्याचं माणूस गेलं असेल, तर आपण जाऊन त्याच्यापाशी नुसते बसतो. बोलण्याची जरूर नाही; बोलायला वावच नाही. उथळ भावनेचे वाहन शब्द आहेत. खोलवरच्या खऱ्या भावनेचं वाहन मौन हेच आहे.

आपण फार बोलतो कारण बोलायचं काहीच नसतं. विचारांचा अभाव झाकण्याकरिता शब्दांचा पडदा टाकतो. आपण पुष्कळ बोलतो कारण आपल्याला काहीच ऐकायचं नाही. ऐकण्यानं ज्ञान येतं, माहिती मिळते, अनुभव वाढतो. ऐकण्यानं जीवन समृद्ध बनतं. पण ऐकण्याकरिता धीर लागतो, इतरांविषयीची गोडी असावी लागते. स्वार्थाचा त्याग लागतो. आणि जर दुसऱ्यांची गोष्ट ऐकू तर कदाचित आपल्याला नावडती गोष्ट ऐकावी लागेल, न आवडणारा आपल्याविषयीचा अभिप्राय ऐकावा लागेल, म्हणून ऐकायचं नाही, आणि ऐकायचं नाही म्हणून बोलणं चालू ठेवायचं. जोवर आपलं बोलणं चालू असेल तोवर दुसऱ्याचं म्हणणं ऐकावं लागणार नाही ना !

म्हणून शब्दात मर्यादा आहे, तर मौनात शक्ती आहे. मौनात आत्मविश्वास आहे, स्थिरता आहे, दुसऱ्यांचं योग्य म्हणणं मान्य करण्याची तयारी आहे.

※

खरं पाहाता मौन ही जिभेची साधना नाही, कानाची साधना आहे. ते ओठाचं तप नाही, हृदयाचं तप आहे. मौन म्हणजे न बोलणं असं नाही. मौन म्हणजे ऐकणं. ध्यानपूर्वक, शांतिपूर्वक, श्रद्धापूर्वक ऐकणं, ऐकत राहणं, ऐकण्याच्या स्थितीतच जगणं हे मौन. आणि ऐकायचं ते जगाची भानगड, लोकांच्या गप्पा किंवा रेडिओच्या बातम्या नव्हे तर हृदयाचा संदेश, ज्ञानाच्या गोष्टी

आणि भक्तीची निमंत्रणं होत. अंतराची वाणी, अंतर्यामीची वाणी ऐकायची. खरं मौन ही प्रार्थनेची तयारी आहे, ध्यानाची अपरिहार्य अशी शर्त आहे. प्रार्थनेत भगवंताचं बोलणं ऐकायचं आहे. म्हणून इंद्रियांना आपण शांत करतो. ध्यानात प्रभूचा संदेश पकडायचा आहे म्हणून मौनाची तयारी करतो. यातच मौनाला खरा अर्थ आहे, मौनाची सार्थकता आहे.

आणि त्यात पुष्कळ वेळा आपली चूकही आहे. कारण प्रार्थनेला आलो होतो ते प्रभूचं बोलणं ऐकायला, पण प्रार्थनेत आपण चालवितो आपल्याच गोष्टी, आपलंच शहाणपण, आपलेच सूर. प्रार्थनेत सुद्धा मौन शोभेल, प्रार्थनेत विशेष शांतीच शोभेल, पण आपण त्यात सुद्धा आपली प्रवृत्ती नि चिंता नि चुळबुळ घेऊन येतो, देवाला आपला अर्ज, आपला संकल्प अन् चातुर्य ऐकवायला येतो आणि ते ऐकविता ऐकविता त्याचं म्हणणं ऐकायचं चुकवितो ! सुरुवातीपासून शेवटपर्यंत भजन नि पाठ, मंत्र नि जप, स्तुती नि आरती. सर्व चांगलं आहे, योग्य आहे आणि ते अंतःकरणाला लाभकारकही होईल, परंतु जर सारा वेळ त्यातच गेला, जर सारी प्रार्थना फक्त आपले विचार, भावना नि आपल्या गोष्टी सांगण्यातच गेली तर जी मुख्य गोष्ट ती राहूनच जाणार; प्रार्थनेत आपण प्रभूला भेटायला आलो होतो, प्रभूचं बोलणं ऐकायला आलो होतो' ते ऐकलं जाणार नाही, आणि आपली प्रार्थना पुन्हा एकदा शुष्क, दुर्बळ नि निष्फल ठरेल.

देवाला बोलू द्या. देवाला त्याचं काम करू द्या. प्रार्थना ही करण्याची वस्तू नाही, करू देण्याची वस्तू आहे, बोलण्याची गोष्ट नाही, ऐकण्याची आहे. प्रार्थना आपला कार्यक्रम नाही, देवाचा आहे. तो दाखवील, तो ऐकवील, तो करील—आपण त्याला करू देऊ तर. आपला धर्म फक्त येण्याचा, येऊन बसण्याचा, ऐकण्याचा आहे. ऐकण्याकरिता शांतीचं वातावरण हवं, अपरिहार्यपणे ध्यान हवं, म्हणून इंद्रियांना आवरण्याकरिता आणि मनाला एकाग्रता आणण्याकरिता एखादं भजन गावं एखादी प्रार्थना म्हणावी, मुख्य पाहुण्यांचं प्रवचन व्हायचं असलं म्हणजे त्याच्या पूर्वतयारीकरिता जसं मंगल गीत गायचं, शिष्टाचाराचे दोन शब्द बोलायचे तसं. पण जर प्रवचनाकरिता ठेवलेला सगळा वेळ त्याच्या तयारीनंच खाल्ला आणि मुख्य पाहुण्यांचा परिचय इतका लांबत गेला की त्यांना बोलायला वेळच राहिला नाही तर ते मंगल गीत अमंगल

होईल, आणि शिष्टाचाराचा अनाचार होईल. आपण प्रार्थना करतो त्यात असं तर होत नसेल? हृदयाचे मोलाचे पाहुण्यांचे शब्द ऐकायला आपण आलो होतो. त्याचं निमंत्रण होतं, त्याचा संदेश होता. त्याचा कार्यक्रम होता. पण आपण प्रस्तावना करायला लागलो, त्याचा परिचय देऊ लागलो, त्याचे शब्द ऐकण्याऐवजी त्याच्याविषयी आपलंच बोलणं चालविलं. आणि त्यात सगळा वेळ गेला. प्रार्थना पूर्ण झाली. मुख्य पाहुण्यांचे आभार मानले, पण त्याला बोलण्याची संधीच दिली नाही. त्याला किती चमत्कारिक वाटलं असेल, अन् आपलं किती नुकसान झालं असेल !

※

आपल्या बोलण्यानं देवाचं बोलणं आपण दडपून टाकतो याचं एक गुप्त अन् अयोग्य कारण असतं, ते हे की, देव जर बोलला तर आपल्याला आवडणार नाही असं सुद्धा बोलेल अशी आपल्याला भीती वाटते. देवाला बोलायला शब्दांची जरूर नाही, आवाजाची जरूर नाही. मानवाचं हृदय त्याच्या हातात असतं, त्याला स्पर्श करून, आवाज न काढता, शब्द न उच्चारता नि कागद-शाई न वापरता आपलं म्हणणं तो जाणवून देऊ शकतो. आपला संदेश स्पष्ट, सरळ नि अचूकपणे पोचवितो. त्याची ती शक्ती आहे, आणि त्याचा आपल्याला अनुभव आहे. देव शाबासकी देईल किंवा ठपका देईल, संतोष दर्शवील किंवा पश्चात्ताप करायला लावील. आणि विशेष म्हणजे कधी कधी देव काही मागेल, करायला सांगेल, आज्ञा फर्मावील. त्याची आपल्याला भीती आहे. देवाला बोलू दिलं, अंतराच्या एकांतात त्याचा संदेश ध्यान लावून ऐकायला बसलो, आणि तो खरंखुरं बोलला, त्याचा संदेश आला आणि त्यात काही आज्ञा आली, आदेश आला, आपल्याला आवडणार नाही असं काही करायला त्यानं सांगितलं आणि आपल्याला आवडणारं काही सोडायला सांगितलं तर ? तर प्रार्थना भलतीच महाग पडेल. भक्ती डोक्यावर बसेल. केवळ थोडीशी शांती नि पुण्य मिळावं म्हणून प्रार्थनेला आलो होतो. तिथं काहीतरी करण्याचा नि जीवन सुधारण्याचा बोजा घेऊन बाहेर आलो. ते नको आहे. ती जबाबदारी अंगावर घ्यायची नाही. आणि म्हणून देवाला बोलण्याची संधी आपण देत नाही. म्हणून उपदेश आणि कथा, भजन नि कीर्तन, पाठ नि पारायण, शब्दांची वृष्टी आणि सुरांचं जाळं. समोरच्या माणसानं बोलू नये

म्हणून आपण बोलत राहावं ही युक्ती. देवाचा आवाज दबावा याकरिता आपण जोरजोरानं गात राहावं ही दुष्टता.

आपल्याला काय मुका देव पाहिजे ? स्तुती ऐकेल, पूजा घेईल, भक्तीनं प्रसन्न होईल असाच देव पाहिजे ? देवाची कथा आपण चालवू, त्याला चालवू देण्याचं साहस नको ! देवाला अर्पण काय करायचं ते आपण ठरवूं, त्याला ते ठरविण्याची संधी द्यायला नको ! हा आपला अविवेक आहे. आणि ते आपलं दुर्भाग्य आहे.

खरा भाव देवाच्या सान्निध्यात येऊन, ध्यानात बसून त्याचा आदेश मागण्यात नि तो शिरी धरण्यात आहे. खरी पूजा शांती ही आहे. खरा विधी मौन हाच आहे. मौन ही प्रार्थनेची तयारी, प्रार्थनेचं स्वरूप आणि प्रार्थनेचं फळ असतं. आणि ते प्रार्थनेचं फळ दुसऱ्यांना सांगण्याचं आणि पोचविण्याचं सुद्धा उत्तम साधन मौन हेच आहे.

मौन आपल्या इंद्रियांना संभाळून घेतं, लोलुपतेचं शमन करतं, मनाला स्थिर करतं. आणि अशा रीतीनं प्रार्थनेची उत्तम तयारी ते करवितं. प्रार्थनेच्या वेळी मौन हे मानवाला देवापुढं शोभेल अशी भावना प्रेरतं, त्याला सावधान ठेवतं, देवाचा संदेश हाती धरण्याला समर्थ करतं. आणि प्रार्थनेनंतर तिचे वातावरण नि तिची धन्यता रोजच्या जीवनात सोबत घेऊन जाण्याला आणि सोबत ठेवण्याला मौन प्रेरणा देतं, आठवण देतं, साधना घडवितं.

खरोखर मौन हा प्रार्थनेचा गाभा आहे.

## ११ : देवापुढं आग्रह धरू या

देवापुढं आग्रह धरणं देवाला आवडतं. प्रार्थनेत विनंती करू, आग्रह धरू. नम्रतेनं न् विवेकानं, पण श्रद्धेनं आणि दडपण टाकून वाद घालणं अन् आग्रह धरणं हे देवाला आवडतं. यात विश्वास आणि प्रेम, चिकाटी नि शरणागती यांचा मेळ आहे. त्यात पूजा नि भक्ती, देवाशी घरच्यासारखा संबंध, आणि त्याबरोबरच आदर अन् पूज्यभाव आहे. म्हणजेच त्यात धर्म आहे, प्रवृत्त धर्म आहे. आणि प्रभूला धर्म आवडतो.

देवाला समजावण्याचा प्रश्नच नाही. तो सारं काही समजतो, जाणतो. आणि करायला तत्पर आहे, करू इच्छितो. खरं पाहाता स्वत:लाच समजाविण्याचा प्रश्न आहे. आपणा स्वत:ला विश्वास वाटावा, भक्ती वाटावी आणि धर्म जागा व्हावा याकरिता युक्तिवाद करायचा असतो, आग्रह करायचा असतो, धडा दुसऱ्याला शिकविताना शिक्षक स्वत: शिकतो; दुसऱ्याला समजावताना आपण बरोबर समजू लागतो. हा न्याय इथं लागू पडतो. आग्रह नि युक्तिवाद देवापुढं चालेल, पण त्याचा प्रभाव पडेल आपल्या मनावर.

" देवा, तुझं वचन आहे. गरज असेल त्याच्या मदतीला तू जातोस, अडचणीत असेल त्याची अडचण तू दूर करतोस. तू भक्ताचा आधार. शरणार्थीचं शरण. नम्र विनंती तू स्वीकारतोस, आर्द्र प्रार्थना तू ऐकतोस. मी तुला शरण आलो आहे, मी प्रार्थना केली, विनंती केली, आणि इतरांना ते माहीत आहे. मी तुझ्याकडून ही कृपा मागितली आहे, हे वरदान मागितलं आहे, हे सगळे जाणतात. नम्रतेनं पण आग्रहानं मी ही मागणी तुझ्यापाशी केली आहे. आणि ती काही लोकांकरिता, चैनीकरिता, धनाकरिता किंवा कीर्तीकरिता केली नाही तर जीवनाच्या पवित्रतेकरिता अन् शुद्धतेकरिता केली आहे. म्हणजेच तुला आवडेल अशी ही मागणी आहे, अन् मला हवी अशी पण आहे. आणि ते सर्वजण जाणतात. आणि तुझं वचनही सर्वांना माहीत आहे. आता तुझ्या अब्रूचा प्रश्न आहे. माझी प्रार्थना जर विफल झाली तर माझं काही जाणार नाही पण तुझी मात्र प्रतिष्ठाच जाईल. भक्ताची लाज जाणार नाही हे वचन आहे. आणि भक्ताची लाज गेली तर त्याच्या भगवंताची लाज सुद्धा जाईल याची आठवण आहे ना? झालं तर मग. आता प्रश्न माझा राहिला नाही. तुझा झाला. माझं कल्याण

त्यात आहे. हे तर खरंच, पण त्याहून तुझा महिमा आता त्यात राहाणार आहे; म्हणून माझ्याकरिता नव्हे तर तुझ्या नावाकरिता प्रार्थना ऐक आणि साहाय्याला ये आणि वरदान दे. "

प्रेमानं हा वाद चालवायचा. मस्तीत येऊन हा आग्रह धरायचा. वकिलाच्या भूमिकेतून नाही तर प्रेमीजनाच्या मस्तीनं अशी चर्चा चालवायची. हा भक्तीचा अधिकार आहे, पूजेचं हे एक स्वरूप आहे. आणि या रीतीनं प्रार्थनेच्या आत्मीयतेनं प्रभूशी वाद घालू तेव्हा अंतःकरणात भक्ती वाढते, श्रद्धा उत्पन्न होते, भाव जागा होतो. आणि श्रद्धा आली की मग प्रार्थना निष्फळ कशी जाईल ? भक्ती आली, मग भगवान नकार कसा देईल ? ही प्रार्थना मागितलेलं वरदान ओढून आणील, इतकंच नव्हे तर त्याबरोबर धर्माची उत्तम साधना तिनं अगोदरच आणलेली आहे. तिचं फळ त्यात आहे. हे साधनाशिवाय साध्य बनतं. जीवनात धर्म आणण्यासाठी प्रार्थना झाली, आणि प्रार्थना करता करता धर्म जीवनात आला. म्हणून ही प्रार्थना प्रभूला आवडते. ती तो कधी निष्फळ जाऊ द्यायचा नाही.

" देवा, लोकांपुढं तुझ्याविषयी सांगायचं आहे. तुझं प्रेम नि तुझा महिमा, तुझी दया नि तुझी शक्ती हे सारं लोकांना समजावून द्यायचं आहे. धर्माच्या गोष्टी बोलायच्या आहेत, भक्तीच्या गोष्टी करायच्या आहेत. लोकांना तुझ्याविषयी उत्साहानं नि आनंदानं, आग्रहपूर्वक नि विश्वासपूर्वक खूप खूप सांगायचं आहे. ही अंतरीची इच्छा आहे, हृदयाची प्रेरणा आहे. पण लोक मला विचारतील, 'देवाविषयी बोलायचा तुम्हाला काय अधिकार ? तुम्हाला त्याचं दर्शन झालंय् ? त्याचा महिमा तुम्हाला दिसलाय्, त्याची शक्ती अनुभवली आहे ? नाही, तर मग त्याच्याविषयी कसे बोलू शकता? धर्माचा पुरावा अनुभव हाच आहे. अनुभव असेल – आणि खरा असेल – तर बोला, आम्ही ऐकू. अनुभव नसेल तर गप्प राहा, घरी बसा. अनुभव खरा आहे की नाही हे आम्ही लगेच पारखू.' लोक मला असं म्हणतील, आणि त्यांचं म्हणणं योग्य असेल. धर्माचा पुरावा अनुभव हा आहे. मला धर्माच्या गोष्टी बोलायच्या आहेत तर आता धर्माचा अनुभव लागेल. तर देवा, हा अनुभव तू नाही का मला देणार ? ही आता माझी प्रार्थना आहे. मला धर्माचा अनुभव करून द्या म्हणजे मी धर्माविषयी विश्वासपूर्वक बोलू शकेन. यात माझा स्वार्थ नाही, तुझा महिमा आहे. माझा लाभ नाही, धर्माचा

जय आहे. धर्माच्या गोष्टी खऱ्या हे मी जाणतो, पण आता त्या मला प्रत्यक्ष पाहू द्यात, ज्या योगानं मला त्या इतरांच्यापुढं सांगता येतील. भक्तीची भावना आणि प्रार्थनेची शक्ती, ध्यानाची समाधी आणि अद्वैताची धन्यता. तसंच तुझं ओझरतं दर्शन नि ऊब, तुझं सान्निध्य नि स्पर्श. ऐकलं होतं ते आता पाहू दे ; कळलं होतं ते अनुभवू दे. हे माझ्याकरिता नाही, दुसऱ्यांना धर्माचा संदेश पोचवायचा त्याकरिता मी हे प्रमाणपत्र मागत आहे. ते तू माझ्या हाती दिलंस की मग मी तुझं काम मोठ्या उत्साहानं करीन. तुला धर्माच्या गोष्टींचा प्रसार नाही का करायचा ? लोकांनी तुला जाणावं, ओळखावं, पुजावं अशी नाही का तुझी इच्छा? आहे ना, मग हा मी आहे. सिद्ध आणि तत्पर. मी त्या गोष्टी बोलेन आणि तो संदेश पसरवीन. आणि तेवढ्याकरिता एवढ्या अनुग्रहाची माझी मागणी आहे, एवढी आवश्यक शिदोरी मी याचीत आहे. मला लायक बनव. मला धर्माचा अनुभव करून दे. मला तुझं दर्शन दे."

किती मधुर हा युक्तिवाद वाटतो ! किती आनंदानं तो करता येईल ! हा हृदयाचा शास्त्रार्थ आहे, भक्तीची वकिली आहे. हृदयाला ती आवडते. म्हणूनच देवाला सुद्धा आवडत असेल. होय, देवापुढं प्रार्थनेत आग्रह धरलेला त्याला आवडतो. त्यात विश्वास, आनंद, मस्ती, छंद, आग्रह नि शरणागती आहे, आणि ते सारं त्याला आवडतं.

पण . . . .

दुसरंही एक देवाला आवडतं. तो आपली गरज जाणतो, आपल्या आवश्यकता त्याला समजतात. आपण मागणी करू त्या अगोदर ते सर्व तो जाणतो, आणि आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो ते त्याला आवडतं. म्हणून सहज उल्लेख करून, फक्त गरज दर्शवून, परिस्थिती जाणवून देऊन सर्व त्याच्या हाती सोपवणं आणि त्याच्या विश्वासावर राहाणं हे देवाला विशेष आवडतं. "प्रभो, तू सर्व जाणतोस. मी अडचणीत सापडलो आहे ते तुला माहीत आहे. बस, मला तेवढं पुरेसं आहे, तू जाणतोस यात सारं येऊन जातं. तू जाणलंस तेव्हा आता मी निश्चित. माझ्या हाती असण्यापेक्षा तुझ्या हाती ती गोष्ट असणं यात अधिक सुरक्षितता आहे. तुझ्यावर मी विसंबून आहे. तुला योग्य वाटेल ते तू कर."

ही उत्कृष्ट प्रार्थना. आग्रह नाही, दबाव नाही, चिंता नाही, शंका नाही. देवानं जाणलं, बस झालं. एकदा नम्रतेनं सांगितलं तेवढं पुरेसं. ही काही एखाद्या पेढीची कचेरी नव्हे की वरचेवर हेलपाटे खावे लागावेत, आठवण द्यावी लागावी, वशिला लावावा लागावा. ही तर परात्पराची राजसभा आहे, राजाधिराजाचं सिंहासन आहे. त्याची कृपा ती आज्ञा, त्याचा अनुग्रह ते वरदान. तो देतो तेव्हा पुरतं देतो, लगेच देतो, मागणीपेक्षा जास्त देतो, अपेक्षेपेक्षा सुद्धा जास्त देतो. त्याची प्रतिज्ञा आहे, त्याचं ते वचन आहे.

"देवा, मी आजारी आहे;" "देवा, उद्या मुलाची परीक्षा आहे," "देवा, वासना जोर करीत आहे," "देवा, मन ताब्यात राहात नाही," "देवा, धंद्यात खोट वसली आहे;" "देवा, घरात आज भांडण झालं." सांगितलं, कानावर घातलं आणि पायांवर डोकं ठेवलं. भक्ती केली, ध्यान धरलं. प्रभूच्या प्रार्थनेत लीन झालो. ते जे काय होतं ते विसरलं गेलं. पण भगवान ते विसरला नाही. ती निर्मळ भक्ती, ते शुद्ध ध्यान, ती संपूर्ण शरणागती त्यानं स्वीकारली आणि त्याबरोबरच हे वरदानही उदारतेनं दिलं.

मूक प्रार्थना. थोडक्यात विनंती. उल्लेख नि सूचना.

मग मौन, विश्वास, भरंवसा, श्रद्धा, शरण, भक्ती.

ही प्रार्थना प्रभूला आवडते, फार आवडते.

वाद घालून नि आग्रह धरून देवावर आपण दडपण आणीत होतो, पण मौन ठेवून आणि फक्त सूचनारूप प्रार्थना करून त्याहूनही अधिक दडपण आपण आणतो. हा खरा आग्रह, कारण हा प्रेमाचा आग्रह आहे, हा खरा अधिकार आहे, कारण तो प्रेमाचा अधिकार आहे– भक्तीचा आग्रह आहे.

प्रार्थना हा प्रेमाचा व्यवहार आहे. कधी बोलणं करून तर कधी शांत राहून, कधी दबाव टाकून तर कधी मौन राहून, कधी हृदयाच्या आवेशात तर कधी भावसमाधीत ही प्रार्थना होते, आणि ते प्रेम वाढतं, ती साधना सिद्ध होते.

प्रभूला आग्रह करू या.

प्रार्थनेत हट्ट धरू या.

भक्तीची जोरी करू या.

आणि जोरी करून करून रोज त्याच्या अधिकाधिक जवळ जात जाऊ या.

▭

## १२ : वेळ नाही !

तुम्ही प्रार्थनेला का बसत नाही ?
वेळ नाही म्हणून.

खरंच, आधुनिक मानवाला वेळ कमी असतो. कामं पुष्कळ असतात, धांदल फार असते. दिवसाचे चोवीस तास त्याला कमी पडतात. सकाळी लवकर बाहेर पडावं लागतं, आणि सांजेला घरी येतो तेव्हा थोडा वेळ असतो पण मनाची तयारी नसते, शांती नसते, लहर नसते. मग प्रार्थनेला कोण बस-णार ? जुन्या जमान्यात लोक रिकामे होते म्हणून प्रार्थनेला अन् ध्यानाला तासन् तास काढू शकत. आपला जमाना थोडा वेगळा. वेग आहे, घाई आहे, गर्दी आहे. कचेरीची वेळ सांभाळायची आहे, समाजाची बंधनं पाळायची आहेत. त्यात धर्माला वेळ राहिलेला नाही. सकाळी उठून देवाचं नाव घेतो तेच पुष्कळ. बाकी खूप वेळपर्यंत स्वस्थपणे प्रार्थनेला बसणं अशक्यच आहे. निवृत्त झालो म्हणजे माळ फिरवू. पण आज काम चालू म्हणून प्रार्थना तहकूब.

वेळ नाही.

वेळ तर आहे. रोज चोवीस तास. पुरते आणि खरे. पण या वेळाची वाटणी आपल्या हातात आहे. या चोवीस तासांतून किती कशात घालवायचे ही आपल्या मर्जीची गोष्ट आहे. आणि आपली मर्जी आपल्या विशिष्ट धोरणा-प्रमाणे त्यांची विभागणी करीत जाते. कामात, आरामात, मनोरंजनात नि गप्पात. आपल्या इच्छेप्रमाणे नि गरजांप्रमाणे ती वेळाची वाटणी करून देते, आणि इतर गोष्टींकरिता 'वेळ नाही' असं म्हणून दिलगिरी व्यक्त करते. जास्त आवडणारी किंवा विशेष हवी असलेली वस्तू ती पहिल्यांदा घेते, आणि इतर सर्व राहून जातं.

※

आमंत्रण आलं. आवडलं. 'जरूर येईन' अशी संमती दर्शविली. दुसरं आमंत्रण आलं. पण तिकडं जाणं आवडत नव्हतं, म्हणून 'वेळ नाही' असं सांगून क्षमा मागितली. वेळ होता, पण एक आमंत्रण आवडत होतं तर दुसरं आवडत नव्हतं, म्हणून वेगळं उत्तर दिलं. 'जरूर येईन' म्हणजे 'आवडलं,' आणि 'वेळ नाही' म्हणजे 'आवडत नाही.' अर्थात् शिष्टाचार म्हणून

'तुमच्या इथं येणं मला आवडत नाही म्हणून येत नाही' असं म्हणणं योग्य नाही होणार, म्हणून शिष्टाचाराचं भाषांतर करून 'येण्याची खूप इच्छा आहे, पण बिलकुल वेळ नाही, काय करावं,' असं आपण म्हणतो.

किंवा रुची-अरुचीचा प्रश्न नसेल, पण लाभाचा – फायद्याचा असेल. कचेरीत जाणं कदाचित आवडत नसेल, पण कचेरीला गेल्यामुळं पैसे मिळतात, पगार मिळतो, म्हणून त्याकरिता भरपूर वेळ आपण काढतो. लाभ आहे म्हणून वेळ काढतो, रुची आहे म्हणून वेळ काढतो. बाकी मग —– 'वेळ नाही.'

प्रार्थनेला बसायला वेळ नाही.

म्हणजे रुची नाही न् लाभ नाही, असा याचा अर्थ झाला. श्रद्धा नाही, विश्वास नाही, इच्छा नाही, मन नाही. प्रार्थना करून काही लभ्यांश नाही, काही फायदा व्हायचा नाही. त्याचा काही उपयोग नाही, काही महत्त्व नाही. म्हणून आपल्या आवडीच्या यादीत प्रार्थना अगदी शेवटी आपण लिहितो. आणि तिचा कधी नंबर लागतच नाही. जर प्रार्थना करून काही निश्चित लाभ लगोलग मिळायचा असता तर तिची नोंद पहिल्यांदा केली असती, आणि तिचा नंबर लागला असता.

※

वेळ नाही.

लोक शिष्टाचार समजतात म्हणून आग्रह पुढं चालवीत नाहीत. वेळ नाही म्हणजे जमण्याजोगं नाही, आवडण्याजोगं नाही, म्हणून येत नाही. ठीक. शिष्टाचारानं आमंत्रण दिलं, शिष्टाचारानं त्यानं निमित्त काढलं आणि संबंध राहिला, समाजाची चालरीत सांभाळली गेली. धन्य आहे त्या शिष्टाचाराची.

वेळ नाही.

देवालाही विवेक समजतो. या लोकांना वेळ नाही म्हणजे त्यांची इच्छा नाही, श्रद्धा नाही हे त्याला समजतं. आणि स्वतःचा अपमानही त्याला समजतो. मी आमंत्रण द्यावं अन् मानवानं ते स्वीकारू नये ? मी बोलवावं नि त्यानं येऊ नये ? मी भेटायला यावं नि त्यानं निमित्त काढावं ? वेळ नाही. देवाला भेटायलाही वेळ नाही ? धर्मासाठी सुद्धा वेळ नाही ? आत्म्याच्या कल्याणाकरिता सुद्धा वेळ नाही ?

※

आणि त्यासाठी मानव मोठा युक्तिवाद करील. चतुर आहे ना तो ! मनुष्य स्वभावानं वकील आहे, म्हणून देवापुढं सुद्धा आपली वकिली तो करून पाहातो. म्हणतो . "प्रार्थनेला वेळ राहात नाही, कारण सारा दिवस कामात असतो, आणि हे काम माझ्या बाबतीत धर्मच नाही का ? ते माझं कर्तव्य आहे. माझ्या कुटुंबाकरिता, माझे आईबाप, मुलंबाळं यांच्याकरिता, चरितार्थ चालविण्याकरिता मी काम करतो. म्हणून तो माझा धर्म आहे, माझं कर्तव्य आहे. माझ्याबाबतीत ती देवाची इच्छा आहे. त्याची आज्ञा आहे. देवाचंच काम आहे. मग मी त्यात गुंतलो तर हरकत काय ? आणि मग प्रार्थनेला वेळ राहिला नाही तरी त्याला वाईट का वाटेल ? " चतुर बोलणं आहे. कुशल युक्तिवाद आहे. तो करून मन खूष होतं. पण अंतराला संतोष नाही. ते जाणतं की हा युक्तिवाद खोटा आहे. पण मनाला ते समजावू शकत नाही.

मनाला जरा समजावू या.

पतीपुढं पत्नी तक्रार करते : "तुम्ही हल्ली घरी जेवत नाही. माझ्या-बरोबर बसत नाही, राहात नाही. सारा दिवस ऑफीस, भेटी गाठी नि धंदा. पण जोडीनं फिरणं नाही, बसणं नाही, राहाणं नाही. आपण याकरिता का लग्न केलं ? तुम्हाला मी प्रिय की काम प्रिय, सांगा ! " तेव्हा पती समर्थन करतो . "मी सारा दिवस आणि अर्धी रात्र काम करीत राहातो ही गोष्ट खरी. पण हे काम तुमच्यासाठीच ना ? तुम्ही आरामानं जगावं, गौरवानं समाजात नांदावं याकरिताच ना मी काम करतो ? म्हणून मला काम प्रिय याचा अर्थ तूच प्रिय असा नाही का ? "

या उत्तरानं काय पत्नीला संतोष होईल ? नाही होणार. पत्नीला माहीत आहे की काम आहे ही गोष्ट खरी. त्यांना खूप काम आहे, आणि ते कुटुंबाकरिताच करतात. पण तिला हेही माहीत आहे की, पतीची इच्छा असती तर तो खूप काम असताना सुद्धा वेळ काढू शकला असता. दुसरेही पती आहेत, त्यांनाही पुष्कळ कामं असतात, आणि तरी ते आपल्या पत्नीबरोबर राहाण्या-बसण्याकरिता वेळ काढतात. पत्नी एवढ्यापर्यंत सुद्धा सांगायला तयार आहे की, जर कामाचाच अडथळा असला अन् काम माझ्याकरिताच असलं तर त्या कामातून होणारा थोडा लाभ सोडून द्यायला मी तयार आहे. मी कमी पैशात चालवीन आणि कमी सुखसोयीत वागेन, पण तेवढा वेळ

आपण एकत्र राहू या, एकत्र नांदू या. एकत्र न राहिलो तर तो पैसा नि ती कीर्ती काय कामाची ?

पत्नीला संतोष नाही.

देवाला संतोष नाही.

देव जाणतो की, मानव कामात आहे आणि ते काम कर्तव्यरूप आहे म्हणजे धर्माचं काम आहे, देवाचं काम आहे. पण देव हे सुद्धा जाणतो की, मनुष्याला वेळ आहे, त्याला रुचलं तर तो वेळ काढू शकेल. उपयोगी वाटतं त्या कामाकरिता तो वेळ काढू शकतो.

पत्नीला संतोष नाही, कारण ती जाणते की, पतीला प्रेम असतं तर तो घरी राहिलाच असता.

देवाला संतोष नाही, कारण तो जाणतो की, जर माणसात भक्ती असती तर तो प्रार्थनेला बसला असता.

वेळ नाही. म्हणजे . . . इच्छा नाही, श्रद्धा नाही, प्रेम नाही.

आणि गंमतीची गोष्ट अशी आहे की, ते प्रेम जागावं, ती श्रद्धा निर्माण व्हावी, ती इच्छा उत्पन्न व्हावी याकरिता उत्तम साधन पुनः प्रार्थना हेच आहे. प्रार्थनेला बसल्यानं भक्ती जागी होते, आणि भक्ती उत्पन्न झाली की, प्रार्थनेला बसण्याची इच्छा होते.

प्रार्थनेला बसायला वेळ नाही. स्पष्ट बोलावं : भक्ती नाही. तर मग भक्ती उत्पन्न व्हावी याकरिता रोज नियमित वेळ काढून निष्ठेनं नि आनंदानं प्रार्थनेला बसू या.

# १३ : नित्य नवीनता

तो वेगळा आहे.

मला वाटलं होतं आता आपण त्याला ओळखतो, जाणतो. इतक्या काळाचा परिचय आहे, इतका जुना संबंध आहे तेव्हा त्याच्याविपयी जे काही कळून घ्यायचं होतं ते सर्व आपल्याला आता कळलेलं आहे, तो कसा आहे हे आपण आता पुरतेपणी पाहून घेतलं आहे.

पण तो वेगळा आहे.

देव वेगळा आहे.

दीर्घकाळचा परिचय आहे. मनाला स्मरतं तेव्हापासून संबंध आहे, सहवास आहे; लहानपणापासून त्याच्या गोष्टी ऐकल्या आहेत, त्याचं दर्शन घेतलं आहे, शास्त्रात त्याच्याविपयी वाचलं आहे, कथांत त्याच्याविषयी ऐकलं आहे; तत्त्वज्ञानात त्याचा अभ्यास केला आहे, प्रार्थनेत त्याचा अनुभव घेतला आहे—अन् तरीही तो नवा न् वेगळा, गूढ न् अकल्प्यच राहाणार. जेव्हा खात्री असावी की तो असं करणार तेव्हा तो दुसरंच करतो, धारणा होती की प्रार्थनेचं असं प्रत्यत्तर देईल तर वेगळंच देतो. त्याची रीत न्यारी, त्याची गती न कळण्याजोगी.

भगवान वेगळा आहे. फक्त माझ्याहून वेगळा आहे असं नाही तर स्वतः-हूनही वेगळा आहे. म्हणजे दर वेळेला नवं स्वरूप घेऊन तो येतो, नवं करतो, नवं दाखवतो. त्याची मुखं चार नाहीत, हजार आहेत. अवतार दहा नाहीत, कोटी आहेत. सहस्र पैलूचा हिरा; सहस्र पाकळ्यांचं कमल. मी एका पैलूचं तेज पाहिलं, एका पाकळीचा रंग बघितला म्हणून वाटलं की झालं, आता आपण त्याला ओळखतो, जाणतो. पण दुसऱ्या वेळी येतो तेव्हा दुसरं दाखवितो, दुसरीच चमक दाखवून जातो. त्याची पुनरावृत्ती होत नाही. नित्य नवीन आहे. खरं म्हणजे, त्याची अनंत स्वरूपं आहेत हेच त्याचं स्वरूप आहे. त्याची व्याख्या नाही ही त्याची व्याख्या आहे.

यात माझी चूक दिसून आली. मी मानलं होतं की मी त्याला ओळखतो तेव्हा या नावानं बोलावलं की तो येईल, या रस्त्यावर वाट पाहिली की भेटेल.

एका अनुभवावरून मी त्याला नाव ठेवलं होतं, त्याचा रस्ता ठरविला होता. पण त्या रस्त्यानं मी पुन्हा गेलो तेव्हा तो भेटला नाही, त्या नावानं हाक मारली तेव्हा आला नाही.

※

एकदा एका देवळात जाऊन एका मूर्तीपुढं ध्यान धरून बसलो असता अंत:करणात एक विलक्षण अनुभव झाला. भक्तीचा उमाळा, शांतीचा सागर, धन्यतेची भरती. सहन न व्हावा असा आनंद, सोसवेना इतकं सुख. मनाला वाटलं की अरे, हे तर स्वर्गाचं दर्शन, मुक्तीची पूर्वसूचना आणि या देवळात हा अनुभव मिळाला, या मूर्तीपुढं झाला तेव्हा त्यांचा प्रताप असावा, त्यांचा चमत्कार असावा. झालं. आपल्याला पाहिजे होतं ते मिळून चुकलं. आता इथं आलो की हृदयाला हा संतोष होईल, मनाला हा आधार लाभेल आणि धर्माचं कार्य आता सोपं बनेल. म्हणून थोडया दिवसांनी पुन्हा त्या देवळात गेलो, त्या मूर्तीच्या पुढं बसलो, ध्यानात उतरण्याची क्रिया सुरू केली. पण मन शून्य. हृदय शुष्क. मूर्ती पाषाणाची. देऊळ सुनं. अरे, थोडया दिवसांपूर्वी याच ठिकाणी दिव्य अनुभव मिळाला होता ना ? पण ते मानणं अवघड झालं. माझी काय चूक झाली होती ? की गैरसमज झाला होता ?

एकदा शास्त्रातले कित्येक श्लोक ध्यानात आले. अत्यंत रोचक, बोधक न् प्रेरक होते. त्यावर प्रार्थना चालविली, मनन केलं, ध्यान धरलं. अंतरातून जणू ज्ञानाची कारंजी उसळू लागली, आणि एकेका श्लोकाचा अर्थ, मर्म, बोध, खोलपणा मनापुढं उघडा झाला आणि आल्हादक रसानिशी अंत:करणाला स्पर्श करून गेला. वाटलं की हे श्लोक जवळ बाळगून सारं आयुष्य जगता येण्यासारखं आहे. यात किती रस आहे, किती ज्ञान आहे ! ते घेऊन पुन्हा मनन करू म्हणजे ते शिक्षण चालू राहील, ते दर्शन प्रगत होईल. या हेतूनं ते श्लोक उतरून घेतले, पाठ केले, सांभाळून ठेवले. आणि दुसऱ्या प्रसंगी पुन्हा प्रेरणा हवी होती, मार्गदर्शनाची जरूर होती, म्हणून वेळ काढून नि एकांत शोधून ते अगणित मोलाचे श्लोक पुन्हा काढले, वाचले, उच्चारले आणि त्यांचा चमत्कार पुन्हा पाहायला लागलो. पण व्यर्थ. श्लोक ते श्लोक. कागदाचा तुकडा न् शाईचे डाग. शब्द अन् वाक्य. व्याकरण नि तर्क पण अर्थ काही नाही. ज्ञान

काही नाही. दोन मिनिटं सुद्धा ते दृष्टीपुढं टिकेनात, मानत राहीनात. मग मनन कसलं नि प्रेरणा कसली ? प्रयोग निष्फळ झाला. श्लोक लिहिलेल्या कागदाचे तत्क्षणी चार तुकडे केले.

काय चूक झाली होती ?

काय गैरसमज झाला होता ?

तोच. देवाची सहस्र मुखं, त्यातलं एक पकडून बसलो. शास्त्राचे हजारो श्लोक आहेत, एकाचीच जिद्द घेऊन बसलो. म्हणजे देवाला बांधून बसलो, त्याच्या समृद्धीचा अनादर करून बसलो, त्याची अनंतता विसरून बसलो. तो एकाच रस्त्यानं दोनदा नाही जायचा; दोनदा तेच निमित्त नाही वापरायचा. त्याचा खजिना अनंत आहे. त्याचं भांडार अमर्याद आहे. मग त्याच एका नाण्याची भीक त्याच्यापाशी मागणं कसं शोभेल ? पृथ्वीच्या राजाची प्रतिष्ठा होती की तो एक वेष दोनदा नाही करणार, एका रथात दोन वेळा नाही बसणार. येईल तेव्हा नव्या रथातून येईल, नव्या वेषात येईल. आणि विश्वाच्या राजाधिराजाची प्रतिज्ञा आहे की तो येईल तेव्हा नव्या रूपात येईल, नव्या श्लोकात येईल; आणि देश-कालाच्या किंवा शास्त्र-मंत्राच्या कोणत्याही बंधनानं बांधला नाही जाणार.

म्हणून मिळाले ते अनुभव खरे होते. ती मूर्ती मंगल अन् ते श्लोक दिव्य. त्या मूर्तीत भगवंताचं दर्शन झालं होतं आणि त्या श्लोकांत त्याचा संदेश मिळाला होता. दोन्ही अनुभव खरे होते. कल्याणकारी होते. पण होऊन गेले होते. शिळे झाले होते. आता पुन त्यात भगवंताला शोधणं शोभण्याजोगं नाही. अन् शोधलं तरी तो भेटणार नाही आणि करुणाजनक गोष्ट अशी की त्या जुन्या अनुभवात त्याला पुनः शोधायला गेल्यानं ज्या नव्या अनुभवात तो आपणाला भेटायला उत्सुक होता ते अनुभव आपले चुकले. जुन्या कुंजात वाट पाहाताना नव्या कुंजाचा वायदा चुकला. जुन्या मंडपात आपला जीव जळत असताना नव्या मंडपातून त्याचं आमंत्रण आलं. पण आपण ते पारखलंच नाही. देवाच्या एकदा अनुभविलेल्या स्वरूपाला चिकटून राहिल्यानं त्याचं नवं स्वरूप आपण पारखू शकलो नाही ही चूक झाली. करुणाजनक नि दुर्दैवी चूक

※

BVBK-0400812



मन उघडं ठेवलं पाहिजे. हृदय निर्मळ ठेवलं पाहिजे. देव वेगळा आहे, नवा आहे, नित्य नवीन आहे, आज तो कोणत्या रस्त्यानं येईल, कोणत्या स्वरूपात येईल हे चटकन् समजण्याकरिता निर्ग्रंथ जागृती पाहिजे.

भगवान दयाळू आहे हे मी जाणतो. पण कदाचित तो आज मला ठपका देईल. देवाचा पुण्यप्रकोप होतो हे मला माहीत आहे. पण कदाचित तो आज दया दाखवण्याचंच ठरवील. माझ्या जुन्या कल्पनेनं त्याला बांधता कामा नये. माझ्या अपुऱ्या ज्ञानानं त्याला मर्यादेत टाकणं बरं नाही.

भक्ताची प्रार्थना होती की, "तुझ्याविषयी माझ्या ज्या खोट्या कल्पना आहेत त्या सुटून जाऊ देत – माझ्या अंत:करणाला ते रुचत नसलं तरी."

उत्तम प्रार्थना होती. देवाजवळ जायला सर्वस्वाचा त्याग करावा असा सामान्य उपदेश आहे. जितका त्याग खरा तितकं ईश्वराचं दर्शन निश्चित. परिग्रह नसला पाहिजे, स्वार्थ नसला पाहिजे. देवाजवळ जाण्याकरिता धनाचा त्याग केला पाहिजे. लोभाचा त्याग केला पाहिजे. अवश्य. पण त्याबरोबर देवाविषयीच्या माझ्या कल्पनांचा त्याग केला पाहिजे, देवाच्या माझ्या जुन्या अनुभवांच्या स्मरणांचा त्याग केला पाहिजे. हा अधिक सूक्ष्म आणि खोल त्यागही केला पाहिजे. त्या वेळी ते अनुभव खरे होते, आज नाहीत. त्या वेळी ते मोलाचे होते, आज क्षीण होऊन गेले आहेत. लोभी मन त्यांनाच चिकटून राहिलं आहे, पण त्यांचा त्याग केला पाहिजे. देवानं आपलं चित्र रेखाटून द्यावं याकरिता मागचा कपडा साफ नि स्वच्छ पाहिजे. देवानं नवे श्लोक लिहून द्यावेत याकरिता लिहिण्याचा कागद शुभ्र नि निर्मळ पाहिजे. त्यावर जुने श्लोक असतील तर नवे येणार नाहीत. जुनं चित्र असेल तर नवं उतरणार नाही. संपूर्ण त्याग पाहिजे. पूर्ण स्वच्छता पाहिजे.

देव नवा आहे. रोज नवा आहे. नित्य नवीन आहे. यात त्याचा गौरव आहे. त्याचं सत्त्वच आहे. माणूस पटकन् ओळखता येतो. त्याचा स्वभाव पाहाता येतो. त्याच्या गोष्टी समजून घेता येतात. त्याच्याशी बोलणं होतं, पहिल्या दिवशी गोडी वाटते, नंतर त्याच त्या गोष्टी येतात, पुनरावर्तन होते, कंटाळा येतो. माणूस मर्यादित आहे म्हणून त्वरित त्याची मर्यादा बांधली जाते, त्याच्या मौलिकतेचा शेवट येतो.